


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६४ वे * अंक ३०७ * नांदेड * सोमवार, दि. १७ नोव्हेंबर २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# दिल्ली ब्लास्ट प्रकरण! एनआयएकडून मोठी कारवाई, आय २० कारचा मालक आमिर राशिदला अटक

## उमरसोबत रचला दहशतवादी कट



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** दिल्ली ब्लास्ट प्रकरणी कडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. आय २० कार विकत घेणाऱ्या आमिर राशिद अलीला अटक करण्यात आली आहे. आमिर राशिद अलीला दिल्लीतून अटक करण्यात आली आहे. आमिर अलीने हल्लेखोरासोबत कट आखला होता. आमिर राशिद अली हा जम्मू काश्मीरमधील पुलवामा येथील रहिवासी आहे.

दिल्ली लाल किल्ला स्फोटात राष्ट्रीय तपास यंत्रणेला मोठे यश मिळाले आहे. एनआयएने आय२० कारचा मालक आमिर रशीद याला अटक केली आहे. आमिरने डॉ. उमरसोबत मिळून दिल्लीत दहशत माजवण्याचा धोकादायक कट रचला होता. आमिर हा जम्मू आणि काश्मीरमधील पंपोर येथील सांबुरा येथील रहिवासी आहे. आत्मघातकी हल्लेखोराने कारमध्ये स्फोट घडवण्यासाठी आयईडीचा वापर केला, ज्यामध्ये १३ जणांचा मृत्यू झाला आणि ३२ जण जखमी झाले, असा महत्त्वपूर्ण खुलासा एनआयएने केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, स्फोटात वापरलेली कार अमीरच्या नावावर नोंदणीकृत होती. तो वाहनातून बाहेर पडणाऱ्या आयईडीमध्ये रूपांतरित होण्यापूर्वी गाडी खरेदी करण्यासाठी मदत मागण्यासाठी दिल्लीला गेला होता. फॉरेन्सिक चाचण्यांमध्ये मृत चालकाची ओळख डॉ. उमर उन नबी अशी झाली आहे, जो फरीदाबादमधील अल फलाह विद्यापीठातील जनरल मेडिसिन विभागातील सहाय्यक प्राध्यापक आणि पुलवामा जिल्ह्यातील रहिवासी आहे. एनआयएने नबीचे आणखी एक वाहन देखील जप्त केले आहे, ज्याची आता पुराव्यासाठी तपासणी केली जात आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दिल्ली लाल किल्ला स्फोटाप्रकरणी अटकेत असलेल्या तीन डॉक्टरांसह चार जणांना रविवारी एनआयएने सोडले आहे. तपासात मुख्य आरोपी डॉ. उमर उन नबीशी त्यांचे कोणतेही ठोस संबंध आढळले नाहीत.

दिल्ली पोलिस, हरियाणा पोलिस, उत्तर प्रदेश पोलिस आणि जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी इतर एजन्सींच्या सहकार्याने ७३ साक्षीदारांच्या मुलाखती घेतल्या आहेत. ज्यात अनेक जखमींचा समावेश आहे. अनेक राज्यांमध्ये तपास सुरू आहे. कारण अधिकारी व्यापक कट उघड करण्यासाठी आणि हल्ल्यात सहभागी असलेल्या सर्वांची ओळख पटवण्यासाठी सुगावा शोधत आहेत.


# नवी मुंबई विमानतळावरुन पहिलं उड्डाण २५ डिसेंबर रोजी

**नवी मुंबई (प्रतिनिधी)–** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ २५ डिसेंबरपासून प्रवासी सेवेसाठी सुरू होणार आहे. मात्र, एअर कॅरिअरच्या विमान भाड्यात तफावत असल्याचं समोर आलं आहे. नवी मुंबईतून इंडिगोचे भाडे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळापेक्षा अधिक, तर अकासा एअरचे भाडे त्याउलट कमी असल्याचं समोर आलं आहे. अकासा एअरनंतर इंडिगोकडूनही कालपासून नवी मुंबईवरुन उड्डाणांची नोंदणी सुरू केल्याची माहिती समोर आली आहे. इंडिगोकडून नवी मुंबईवरून १० भारतीय शहरांसाठी उड्डाणांची सुविधा उपलब्ध तर अकासाकडून दिल्ली, कोच्ची, गोवा आणि अहमदाबादसाठी सेवा नियमित सुरू राहणार आहे. या विमानतळाचे उद्घाटन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ८ ऑक्टोबर रोजी झाले होते.

# पोलिसांची आरोपीवर फायरिंग; भगतसिंघ रोडवरील घटना

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहर आणि जिल्ह्यामध्ये खंडणी, जबरी चोरी, घातक शस्त्र बाळगणे यासह आदी गंभीर गुन्हे दाखल असलेला आरोपी व मागील अनेक दिवसांपासून पोलिसांना पाहिजे असलेला रबज्योतसिंघ उर्फ गब्या तिवाणा याच्यावर पोलिसांनी गोळीबार करावा लागल्याची घटना घडली आहे. या आरोपीस पोलिसांनी अटक करण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने पोलिसांवरच शस्त्र उगारण्याचा प्रयत्न केला. मात्र सावध असलेल्या पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ आपल्या सरकारी पिस्तूलमधून गोळी झाडून त्याला जखमी केले. हा थरार भगतसिंघ रोडवर एका धाब्याजवळ रविवारी पहाटे एकच्या सुमारास घडला. जखमीवर शासकीय रुग्णालय विष्णुपुरी येथे उपचार सुरू आहेत. त्याच्याकडून पोलिसांनी एक पिस्तूल आणि खंजर जप्त केले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक विठ्ठल घोगरे व त्यांच्या पथकातील अंमलदार शहरात गस्त घालत होते. वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांना पाहिजे असलेला सराईत



गुन्हेगार रबज्यातसिंघ उर्फ गब्या जसविंदरसिंघ तिवाणा (वय ३० रा. निधानसिंघ कॉलनी भगतसिंघ रोड नांदेड) हा घरी असल्याची माहिती मिळाली. या पथकाने वजिराबाद पोलीस ठाण्याच्या सहायक पोलीस निरीक्षक चिमा बोईने, उमाकांत पुणे आणि राजू वटाणे व त्यांच्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन या परिसरात सापळा रचला. अपहरण, खंडणी, विनापरवाना शस्त्र बाळगणे यासारख्या गंभीर गुन्ह्यातील पाहिजे असलेला आरोपी रबज्योतसिंघ हा त्याच्या राहत्या घरी असल्याचे कळल्यानंतर पोलिसांनी परिसरात बंदोबस्त वाढवला. सपोनि घोगरे यांनी सपोनि आरसेवार, पोलीस ठाणे वजिराबाद येथील सपोनि बोयने त्यांची टीम पाहणी करत असताना आरोपी हा त्याच्या घराच्या छतावर असल्याचा संशय आल्याने हजर असलेल्या सर्व स्टाफने आरोपीचे घरास घेराव घातला व पोलीस ठाणे वजिराबाद येथील अंमलदार गणेश धुमाळ हे घराचे छतावर जाऊन आरोपीचा शोध घेत असताना आरोपीने त्याचे ताब्यातील गावठी पिस्टल पोलीस अंमलदार धुमाळ यांच्या दिशेने रोखली. पोलीस अंमलदार गणेश धुमाळ यांनी स्वतः च्या बचावासाठी न डगमगता त्यांच्या जवळील सरकारी पिस्टलने आरोपी रबज्योतसिंघ याच्या पायावर गोळी लागली. आरोपी हा सध्या पोलिसांच्या ताब्यात असून त्याच्यावर सरकारी दवाखाना नांदेड येथे उपचार चालू आहेत. याप्रकरणी एलसीबीचे खंडणी विरोधी पथकाचे प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक विठ्ठल घोगरे यांच्या फिर्यादीवरून इतवारा पोलीस ठाण्यात कलम १४० (२), ३५२ बीएनएसनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तरुणांनी कोणत्याही गुन्हेगारी टोळ्या बनवू नये अथवा कोणत्या गुन्हेगारी टोळीमध्ये सामील होऊ नये, अन्यथा त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल असा इशारा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिला आहे.

# छत्तीसगडमधील सुकमात चकमक, तीन नक्षलवादी ठार

**सुकमा (प्रतिनिधी)–** छत्तीसगड मधील सुकमाच्या जंगलात सुरक्षा पथक आणि नक्षलवादी यांच्यात चकमक झाली. या चकमकीत तीन माओवादी नक्षलवादी ठार झाले. चकमक भेज्जी और चिंतागुफा या दोन पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील जंगलात झाली. जंगलात डोंगराळ भागात कारीगुंडमजवळ चकमक झाली.

गुप्तचर यंत्रणेने दिलेल्या माहितीआधारे सापळा रचून डिस्ट्रिक्ट रिझर्व्ह गार्ड अर्थात डीआरजीने नक्षलवाद्यांविरोधात कारवाई केली. सुरक्षा पथक आणि नक्षलवादी यांच्यात झालेल्या चकमकीत तीन माओवादी नक्षलवादी ठार झाले. एसीएम दर्जाचे नक्षलवादी चकमकीत मारले गेले. ठार झालेल्या नक्षलवाद्यांकडून मोठा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. छत्तीसगडमध्ये यंदाच्या वर्षी म्हणजेच २०२५ मध्ये आतापर्यंत २६२ नक्षलवादी ठार झाले आहेत. ठार झालेले बहुसंख्य नक्षलवादी हे बस्तर विभागातील आहेत. बस्तर विभागातच सुकमा येते. ताज्या चकमकीची माहिती देताना एसपी किरण चव्हाण यांनी सुरक्षा पथकातील जवानांचे कौतुक केले. चकमकीत तीन नक्षलवादी ठार झाल्याचे त्यांनी सांगितले. सुरक्षा पथकाचील सर्व सदस्य सुरक्षित आहेत, असेही ते म्हणाले. देशात ठिकठिकाणी नक्षलवाद्यांविरोधात कठोर कारवाई सुरू आहे. शरण या नाहीतर सुरक्षा पथकाच्या कारवाईला सामोरे जा असा इशारा अमित शाह यांनी दिला आहे.

# लोखंड स्क्रॅप मिळवून देण्याच्या नावाखाली ६५ लाख रुपयांची फसवणूक; एकाविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील सिडको एमआयडीसी बळीरामपूर परिसरात असलेल्या सिप्टा कंपनीतील मशिनरीचे पाच टन लोखंड स्क्रैप करुन देतो असे म्हणून ६५ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलिसांनी एकाविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

एमआयडीसी बळीरामपूर येथे आरोपी राजविर गजराजसिंघ मल्होत्रा, रा. मंगलदिप हाउस काळेवाडी जवळ पुणे याने




मोहम्मद ताहेर अली सरदार अली व त्यांच्या साक्षीदारांना सिप्टा कंपनीतील मशिनरीचे पाच टन लोखंड स्क्रैप करुन देतो असे म्हणून आरटीजीएसव्दारे मोहम्मद ताहेर यांच्या खात्यावरून ५० लाख रुपये व साक्षीदार यांच्याकडून ५ लाख रुपये खात्यावरून तसेच नगदी १० लाख रुपये असे एकूण ६५ लाख रुपये घेवुन सिप्टा कंपनीतील लोखंड स्क्रॅपसाठी दिले नाही. दिलेला चेक बॉउन्स झाल्याने त्यांची फसवणूक केली. या प्रकरणी मोहम्मद ताहेरअली सरदारअली रा. तरोडा बु. याने दिलेल्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि बाबुराव चव्हाण करत आहेत.

# अखेर डोनाल्ड ट्रम्प यांची माघार, भारताच्या प्रस्तावाला मान्यता

**मुंबई (प्रतिनिधी)–** गेल्या काही काळापासून भारत आणि अमेरिकेतील संबंध ताणलेले आहेत. अशातच आता दोन्ही देशांमधील व्यापार कराराबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. दोन्ही देशांच्या प्रतिनिधींमध्ये चर्चेच्या अनेक फेऱ्यांनंतर आता करार अंतिम टप्प्यात पोहोचला असल्याचे बोलले जात आहे. आता या महिन्याच्या अखेरीस या व्यापार कराराची अधिकृत घोषणा होण्याचीही शक्यता आहे. यामुळे भारतीय वस्तूंवरील कर कमी होणार आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अमेरिकेने भारतावर २५ टक्के अतिरिक्त शुक्ल लादले होते, ते आता मागे घेण्यास डोनाल्ड ट्रम्प तयार आहेत. तसेच भारत अमेरिकेच्या कृषी उत्पादनांसाठी आपल्या देशील बाजारपेठ खुली करण्यास तयार असल्याचेही समोर आले आहे. तसेच दोन्ही अलिकडच्या काळात वाढलेला व्यापारातील तणाव कमी करण्यास तयार आहेत. रशियाकडून तेल खरेदीमुळे दोन्ही देशांमध्ये तणाव निर्माण झाला होता, मात्र आता या वादावर तोडगा निघाल्याने व्यापार करारातील मोठा अडथळा दूर झाला आहे.

भारत अमेरिका व्यापार कराराशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्यांनी म्हटले की, अमेरिकने लादलेले अतिरिक्त शुल्क काढून टाकल्यानंतर पुढील चर्चा आणखी वेगाने होईल'. रशियाकडून तेल खरेदी केल्यामुळे अमेरिकेने २५ टक्के अतिरिक्त शुल्क लादले होते, मात्र आता भारताने तेलाची आयात कमी केल्यामुळे दोन्ही देशांमधील तणाव कमी झाली आहे.

# राज्यात थंडीच्या लाटेची शक्यता

**पुणे (प्रतिनिधी)–** निरभ्र आकाश, वातावरणात बाष्पाचा अभाव, उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे राज्यात थंडीच्या लाटेसदृश स्थिती निर्माण झाली आहे. पुढील दोन दिवस हीच स्थिती कायम राहणार असून, त्यानंतर 'वेस्टर्न डिस्टर्बन्स'मुळे तापमानात वाढ होऊ शकते, असे हवामानतज्ज्ञांचा अंदाज आहे. गेल्या काही दिवसांत विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील काही ठिकाणी सातत्याने किमान तापमानात घट होत आहे.

# सुपर संडे! किनवट नगराध्यक्षपदासाठी ४ तर प्रभागांसाठी ५४ अर्ज

**किनवट (प्रतिनिधी)–** पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत रविवार, दि.१६ उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठीचा सुपर संडे ठरला असून,थेट नगराध्यक्षपदासाठी ४ तर विविध प्रभागांसाठी तब्बल ५४ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. सोमवारी अखेरच्या दिवशी उमेदवारी अर्जांचा पाऊस पडणार आहे.

किनवट पालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपुष्टात येत असताना इच्छूक उमेदवारांनी अर्ज दाखल करण्यासाठी गर्दी केली आहे. रविवारी सुट्टीच्या दिवशी थेट नगराध्यक्षपदासाठी माजी नगराध्यक्ष साजीद खान यांच्या पत्नी खान जरीना साजीद, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार यांच्या पत्नी सौ.पुष्पा आनंद मच्छेवार यांच्यासह काजी राहत तबस्सुम काजी शफियोद्दीन व शेख तयमाबेगम शेख खाजामियाँ यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. तर विविध प्रभागांसाठी ५४ उमेदवारांनी अर्ज दाखल केला आहे.नगराध्यक्षपदासाठी आतापर्यंत १० उमेदवारांनी तर विविध प्रभागांच्या २१ जागांसाठी तब्बल ११४ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत.सोमवारी दुपारी २ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत असल्याने उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मोठी गर्दी होणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत संपत आली असतानाही प्रमुख राजकीय पक्षांचे नगराध्यक्षासह प्रभागांतील उमेदवार ठरले नसल्याने इच्छुकांची धाकधूक वाढली आहे. उमेदवारीचा गुंता सुटत नसल्याने भाजपच्या नगराध्यक्षपदाच्या एका इच्छूक उमेदवाराने राष्ट्रवादी (श.प.) पक्षाशी संपर्क साधून राष्ट्रवादीच्या तुतारी निशाणीवर नगराध्यक्षपदाची निवडणूक लढविण्याची जोरदार तयारी केली आहे. प्रमुख राजकीय पक्षांच्या उमेदवारांची यादी जाहीर झाल्यानंतर सर्वच पक्षांत मोठ्या प्रमाणावर बंडखोरी होणार आहे.

# मनसेला धक्का, अमित ठाकरेंवर गुन्हा दाखल

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची लगबग सुरू असताना मनसेला धक्का बसला आहे.



मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे सुपुत्र अमित ठाकरेंवर गुन्हा दाखल झाला आहे. नेरूळ येथील राजीव गांधी उड्डाणपुलाजवळ उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंहासनारूढ भव्य पुतळ्याचे उद्घाटन करताना जमावबंदीचे उल्लंघन, परवानगीशिवाय कार्यक्रम आयोजित करणे आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी मनसे नेते अमित ठाकरेंसह ७० मनसैनिकांवर नेरूळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.




# भारतविरूद्ध द. आफ्रिका कसोटी : अवघ्या तीन दिवसांत भारताचा पराभव, मालिकेत पिछाडी

**कोलकाता (प्रतिनिधी)–** ईडनगार्डन्सवरील पहिली कसोटी अवघ्या तीन दिवसांत संपली. भारताला अनपेक्षित पराभवाचा सामना करावा लागला. दमदार गोलंदाजी करुनही भारतीय फलंदाजांनी निराश केले, परिणामी दक्षिण आफ्रिकेने दोन सामन्यांच्या मालिकेत १–० अशी आघाडी घेतली. आता मालिकेत परतण्यासाठी गुवाहाटीतील दुसरी कसोटी भारतासाठी निर्णायक ठरणार आहे.

टॉस जिंकून फलंदाजी घेण्याचा निर्णय पाहुण्यांना अंगलट आला. भारतीय गोलंदाजांनी अफलातून मारा करत आफ्रिकन संघाला १५९ धावांत गुंडाळले. कोणताही फलंदाज अर्धशतक गाठू शकला नाही. एडन मार्करमने ३१ धावांसह सर्वाधिक धावा केल्या. भारताकडून जसप्रीत बुमराहने २७ धावांत ५ बळी घेतले.


यानंतर दक्षिण आफ्रिकेने भारताचा पहिला डाव २०० पेक्षा कमी धावांत गुंडाळला. के. एल. राहुलने ३९ धावांची सर्वोच्च खेळी केली.



सुंदर (२९), जाडेजा (२७) आणि पंत (२७) यांनी चांगली सुरुवात करूनही मोठी खेळी केली नाही. कर्णधार शुभमन गिल दुखापतीमुळे फक्त ४ धावांवर रिटायर्ड हर्ट झाला. भारताचा डाव १८९ धावांवर संपला आणि ३० धावांची आघाडी मिळाली. आफ्रिकेकडून सायमन हार्मरने ४ आणि मार्को जान्सेनने ३ बळी घेतले.

दुसऱ्या डावातही भारतीय गोलंदाजांनी आफ्रिकेचा डाव मोडून काढला. ९१ वरच त्यांचे सात गडी बाद झाले. जाडेजाने मार्करम, मुल्डर, डी झोरजी आणि स्टब्सला बाद करत आफ्रिकेची वाटचाल थांबवली. तथापि, कर्णधार टेम्बा बावुमाने जबरदस्त जिद्द दाखवत संघाला सावरले. कॉर्बिन बॉशसोबत ४४ धावांची भागीदारी करीत त्याने नाबाद ५५ धावा केल्या. अखेरीस दक्षिण आफ्रिकेचा दुसरा डाव १५३ धावांवर आटोपला. जाडेजाने भारताकडून पुन्हा ४ बळी घेतले.

पहिल्या डावातील ३० धावांच्या आघाडीनंतर भारतासमोर १२४ धावांचे साधारण लक्ष्य होते. मात्र सुरुवातीलाच जान्सेनने यशस्वी जयस्वाल आणि के.एल. राहुलला स्वस्तात बाद करून भारताला धक्का दिला. त्यानंतर जुरेल, जाडेजा आणि सुंदर यांनाही मोठी भागीदारी करणे जमले नाही. हार्मरच्या फिरकीने भारताचे चक्र विस्कटले.




# सीएनजी गॅस पाईपलाईनमध्ये बिघाड; मुंबईसह नवी मुंबई, ठाण्यातील प्रवासावर परिणाम

**मुंबई (प्रतिनिधी)–** सीएनजी पाईपलाईनमध्ये बिघाड झाल्याने मुंबई, नवी मुंबई आणि ठाण्यात सीएनजी पुरवठ्यावर परिणाम होणार आहे. गेलच्या मुख्य गॅस पाईपलाईनमध्ये बिघाड झाल्याने त्याचा परिणाम सीएनजी पुरवठ्यावर झाला आहे. त्यामुळे सीएनजीवर धावणाऱ्या रिक्षा, टॅक्सी, बस आणि खासगी वाहनांना या टंचाईचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. असं असलं तरी घरगुती पीएनजी ग्राहकांना मात्र कोणत्याही व्यत्ययाशिवाय गॅस पुरवठा सुरू राहणार असल्याचं महानगर गॅस लिमिटेड कंपनीकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात महानगर गॅस लिमिटेडकडून गॅसचा पुरवठा केला जातो. मात्र, आरसीएफ कंपाऊंडमधील गेलच्या मुख्य गॅस पाईपलाईनमध्ये बिघाड झाल्याची घटना समोर आली आहे. यामुळे वडाळा येथील एमजीएलच्या सिटी गेट स्टेशनला होणारा सीएनजी गॅस पुरवठा प्रभावित झाला आहे. याचा फटका मुंबईत गॅस पुरवठ्यावर झाल्याचं पाहायला मिळतं आहे.

मुंबईसह ठाणे आणि नवी मुंबईतील सीएनजी पुरवठ्यावर परिणाम झाल्याने सीएनजीवर धावणाऱ्या रिक्षा, टॅक्सी, बस आणि खाजगी वाहनांना या टंचाईचा सामना करावा लागणार आहे. हा पुरवठा कधीपर्यंत पूर्ववत होणार याची निश्चित माहिती नाही. त्यामुळे सोमवार या परिस्थितीचा वाहतुकीवर, प्रवाशांवर आणि सार्वजनिक वाहनसेवेवर नेमका किती परिणाम होणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

महानगर गॅस लिमिटेड कंपनीने या संबंधी एक निवेदन प्रसिद्ध केलं आहे. पाईपलाईन दुरुस्तीचे काम सुरू असून सीएनजी सेवा लवकरच पूर्ववत करण्यात येईल असा विश्वास कंपनीने व्यक्त केला आहे. तसेच याचा परिणाम घरगुती गॅस पुरवठ्यावर होणार नसल्याचं स्पष्ट करण्यात आलं आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# बिहारमध्ये बदलांची दिशा

बिहारच्या राजकारणात अलीकडील विधानसभा निवडणुकीने एक प्रचंड भूकंप घडवून आणला आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए)ला २४३ पैकी २०० हून अधिक जागा मिळाल्या आहेत. भाजप आणि जनता दल (युनायटेड) हे जवळजवळ समान ताकदीचे भागीदार या निवडणुकीत एकमेकांशीच सर्वात मोठा पक्ष ठरण्याच्या स्पर्धेत दिसत होते. त्याच्या उलट, महागठबंधनची स्थिती अत्यंत दयनीय ठरली आहे. राष्ट्रीय जनता दल, ज्याने मागील निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष म्हणून उदय घेतला होता, यंदा मान्यताप्राप्त पक्षाचा दर्जाही टिकवून ठेवण्याची झुंज देत आहे. राहुल गांधी यांचं सक्षम नेतृत्व असलेला काँग्रेस पक्ष तर अल्पसंख्याक ठरला आहे. या निवडणुकीची एक महत्त्वाची नोंद म्हणजे ६७.१३ टक्क्यांपर्यंत पोहोचलेले विक्रमी मतदान. विशेष म्हणजे महिलांनी पुरुषांच्या तुलनेत मोठ्या प्रमाणावर मतदानात सहभाग घेतल्याचे दिसून आले. मतदार यादीतील विशेष पुनरावलोकनासंदर्भात देशभर सुरू असलेल्या वादविवादाच्या पार्श्व-भूमीवरही इतका मोठा प्रतिसाद मिळणे ही लोकशाही प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास अधोरेखित करणारी बाब आहे. निकालांचा सखोल अभ्यास पुढे होईलच, मात्र आतापासूनच हे स्पष्ट झाले आहे की बिहारच्या सर्वच सामाजिक-आर्थिक स्तरांमध्ये एनडीएची पकड अधिक दृढ झाली आहे. जातीय समीकरणांनी गुन्हेगारीच्या उच्छांकाने ग्रासलेल्या बिहारच्या राजकारणात हा बदल लक्षणीय ठरतो. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री नीतीश कुमार यांच्या डबल इंजिन सरकारची परिणामकारकता मतदारांनी अनुभवली असून याच प्रशासनिक स्थैर्याला त्यांनी कणखर समर्थन दिले आहे. नितीश कुमार यांनी पुन्हा एकदा विरोधकांच्या नकारात्मक प्रचाराचे हत्यार निष्प्रभ केले आहे. २००५ पासून ते सलग सत्तेत असूनही लोकांचा पाठिंबा कायम राखण्यात त्यांनी यश मिळवले. अलीकडच्या निवडणुकांमध्ये कमी होत चाललेल्या जनाधारानंतरही जेडीयूचा यंदाचा प्रदर्शन उल्लेखनीय आहे. २०१५ मध्ये ७१ जागा मिळवणाऱ्या पक्षाला २०२० मध्ये केवळ ४३ जागा मिळाल्या होत्या. यंदाचा विजय हा त्यांच्या राजकीय कौशल्याचा पुनर्प्रत्यय मानला जातो. पंतप्रधान मोदींनीही नितीश कुमार यांच्या योगदानाचे विशेष कौतुक करून हा विजय अधिक अर्थपूर्ण बनवला. भाजपसाठीही बिहार अत्यंत महत्त्वपूर्ण ठरत आहे. उत्तर भारतातील हे एकमेव मोठे राज्य आहे जिथे पक्षाला अद्याप स्वतःच्या बळावर सत्ता स्थापता आलेली नव्हती. त्यामुळे एनडीएच्या या विजयामुळे भाजपच्या देशव्यापी विस्ताराला नवी चालना मिळणार आहे. पुढील वर्षी पश्चिम बंगाल, केरळ, तमिळनाडू या महत्त्वाच्या राज्यांत विधानसभा निवडणुका होत आहेत. बिहारचा विजय त्या लढतींसाठी प्रेरणादायी ठरेल, विशेषतः २०२४ लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशातील अपेक्षाभंगानंतर पक्षाला स्वतःची पुनर्रचना करण्याची ही महत्त्वाची संधी आहे. लोजपानेही या निवडणुकीत चांगली वाढ नोंदवली असून, चिराग पासवान यांनी एनडीएचे पाय तळागाळात मजबूत करण्यात हातभार लावला आहे. तिसरा पर्याय म्हणून चर्चेत असलेल्या प्रशांत किशोर यांच्या जनसुराज्य पक्षाला एकही जागा न मिळणे हे बिहारच्या राजकारणातील वास्तव अधोरेखित करते की मतदारांकडून पर्याय हवा असला तरी तो वास्तववादी आणि विश्वासार्ह असावा लागतो. या निकालांमुळे भाजपच्या विरोधकांनाही आत्म चिंतनाची वेळ आली आहे. महागठबंधनातील परस्परविरोधी भूमिका, नेतृत्वाचा अभाव आणि स्पष्ट धोरणात्मक विचारांची कमतरता या निवडणुकीत ठळकपणे उघड झाल्या. एकत्र येऊनही पर्याय देण्यात ते अपयशी ठरले आणि मतदारांनी त्यांना नकार दिला. बिहारचा हा ऐतिहासिक विजय केवळ एका राज्यापुरता मर्यादित नसून देशातील आगामी राजकीय घडामोडींवर दूरगामी परिणाम घडवणारा आहे. शासनाचे स्थैर्य, विकासाचा अजेंडा आणि प्रभावी नेतृत्त्व या घटकांना मतदारांनी दिलेला स्पष्ट कौल भविष्यातील राजकारणाला नवा वेग देणारा ठरणार आहे.

# लोभ अहंता नये मना, जगी विरक्त तोचि जाणा!

नामा म्हणे आतां लोपला दिनकर ।
बाप ज्ञानेश्वर समाधिस्थ ।।

माणसाचे आयुष्य दीर्घ असण्यापेक्षा स्वल्पस्वर्ग असावे! माणूस किती जगला यापेक्षा कसा जगला हे मोलाचे! किती सत्ता, संपत्ती कमावली याचा ऐवजी त्याने काय लोकोपयोगी कार्य केले हे बहुमोल आहे. या सर्वच महान विचारांचा प्रत्यय जगाच्या इतिहासाच्या पानापानावर कोरला आहे. श्रीमंत, मोठ्या पदांवरील माणसांना महामानव अथवा महापुरुष म्हणून ओळखले जात नाही, सर्वदूर त्यांची जयंती-मयंती होत नाही. उलट अशी अनेक कफल्लक माणसे होऊन गेली ज्यांच्या घरी अंत्यसंस्कार करायला पैसे नव्हते अशा माणसांची संपूर्ण जग तळी उचलते! हा इतिहास मोठा मजे-शीर आणि विस्मयकारी आहे. हे सर्व आपल्याला कळते, पण अत्यल्प लोकांना वळते आणि ज्यांना वळते तेच जगाच्या जगण्याची, विचारांची दिशा वळविण्याचे काम करत आले असून यावश्चंद्र दिवाकरो ते करत राहतील. एवढे लिहिण्याचे प्रयोजन म्हणजे वारकरी संप्रदायाचा पाया, अलंदीप संतश्रेष्ठ ज्ञानराज माउली यांचा आज समाधी सोहळा!

संत ज्ञानेश्वरादी भावंडांचे जीवन सर्वश्रुत आहे. खडतर काळ काय असतो(?) तो या भावंडांना विचारा. तेराव्या शतकात इथल्या पोटभरू, बाजारू, माणूसद्वेष्ट्या धर्ममार्तंडांनी महाराष्ट्र सामाजिक, धार्मिक आणि मानवतेच्या दृष्टीने किती अधोगतीला नेला होता(?) हे पहायचे असेल तर या भावंडांच्या जगण्याच्या इतिहासाची पाने पुरेशी आहेत! माणसासाठी धर्म की धर्मासाठी माणूस? माणूस जगला तर धर्म टिकेल की; धर्म टिकला म्हणजे माणूस जगेल? हे साधे गणित न समजणाऱ्या थोतांड धार्मिक लोकांनी खऱ्या अर्थाने धर्मात कट्टरता आणून त्या त्या धर्माचा ऱ्हास केला आहे हे त्या त्या काळातील घटनांना जरा विचारून पहा!

संत निवृत्तीनाथ आदी भावडांचे आई-वडिलांना आपल्या मुलांना समाजात



उजळ माथ्याने जगता यावे म्हणून जल-समाधी घ्यावी लागली. त्यानंतर पोरकी झालेली अपेगावची ही भावंड आळंदी-पैठण असा प्रवास करतांना त्यांना कुठेही आसरा मिळाला नाही. भिक्षाटन करणाऱ्या ज्ञानदेवांची अक्षरशः झोळी फाडून टाकली, पीठ फेकून दिले! अशा अवस्थेत व्यथित झालेले युवा ज्ञानदेव स्वतःला घरात कोंडून घेतात. चिमुकली बहिण मुक्ताई आपल्या

संत तोचौ जाणा जगी ।
दया क्षमा ज्याचे अंगी ।।१।।
लोभ अहंता नये मना ।
जगी विरक्त तोचि जाणा ।।२।।
इह परलोकि सुखी ।
शुद्ध ज्ञान ज्याचे मुखी ।।३।।
मिथ्या कल्पना मागे सारा ।
ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।४।।

ताटीच्या अभंगातून ज्ञानदादांना धीर देऊन जागृत करते. ताटीच्या अभंगानंतर ज्ञानदेवांनी मात्र मागे वळून पाहिलेच नाही. मूलतः विठ्ठलपंत नाथपंथी असल्याने त्यांना वैदिकांनी स्वीकारले नाही. याचा परिणाम त्यांच्या मुलांना भोगावा लागला. पंढरपूरच्या वाळवंटात संत नामदेव-ादी वारकरी संतांनी उभारलेली समता-मम तेची वारकरी चळवळ महाराष्ट्रभर माहिती झाली होती. वाळवंटातील ही वारकरी क्रांतिकारी चळवळ वर्ण-वंश-जात-धर्म-पंथ-लिंग इत्यादी भेदाच्या पलीकडे काम करत आहे याची माहिती मिळाल्यानंतर ज्ञानदेवादी भावंडे पंढरपूरच्या वाळवंटातील नामदेवांच्या क्रांतीला येऊन मिळाली. माणूस ओळखायला माणसाकडे प्रज्ञा लागते; ती नामदेवांकडे असल्यामुळे नामदेवांनी ज्ञानदेवांना हृदयाशी कवटाळले! दोन महान विभूतींचे मनोमिलन झाले. वारकरी संप्रदायासाठी ही फार महान घटना होती. नाम आणि ज्ञानाचे मिलन होते. भक्ती आणि प्रज्ञा एकमेकांत मिसळली. संत नामदेवांनी नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी म्हणत कीर्तन परंपरेची मुहूर्तमेढ रोवली. याला जोडून नाम भक्तीला ज्ञानाची जोड देण्याचे महत्कार्य ज्ञानदेवांनी केले. त्यात श्रीमद् भगवद्गी-तेवर ज्ञानेश्वरी सारखा अनमोल ग्रंथ लिहून वारकरी संप्रदायाला प्रमाण ग्रंथ दिला. खऱ्या अर्थाने नाम-ज्ञानदेवांनी वारकरी संप्रदाय पायात मजबूत केला. या दोन वारकरी मित्रांच्या जोडीला अनेक दिग्गज वारकरी मंडळी येऊन जुटली. त्यात जेष्ठ वारकरी संत सावतोबा, संत गोरोबा, संत जनाबाई, संत चोखोबा, संत परिसा, संत मुक्ताबाई, संत कान्होपात्रा, संत सोयराबाई, संत बंका आदि अठरापगड जातीतील संत या क्रांतिकारी चळवळीला केवळ येऊन मिळाले. त्यांनी नामदेव-ज्ञानदेवांना कीर्तन-लेखन कार्याला बळ देऊन स्वतः भजन, कीर्तन करतांना अभंग लेखन केले. त्यात संत ज्ञानदेवांची ज्ञानाधीष्टीत ग्रंथ सर्वांना आवडू लागले. वयाने लहान असून अत्यंत नम्र असणारे ज्ञानदेव जेंव्हा आपल्या वारकरी संतांच्या मेळ्यात आपली प्रज्ञा, प्रतिभा प्रकट करत असतांना सर्व संतांना युवा ज्ञानदेवांचा गर्व वाटायचा! सर्व संत त्यांना सन्मानाने लिहायला प्ररणा द्यायचे. याचा परिणाम म्हणजे सर्वच संतांच्या बरोबरीने ज्ञानदेव अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, हरिपाठ इत्यादीसारखे महत्वपूर्ण ग्रंथ लिहते झाले.

संत नामदेव हे संत ज्ञानदेवांपेक्षा ५-६ वर्षांनी जेष्ठ असले तरीही सम वयस्क वारकरी. त्यांची मैत्री जगप्रसिद्ध आहे. संपूर्ण वारकरी संप्रदाय इतिहासात नामदेव-ज्ञानदेव ही जोडी उच्चतम मित्र म्हणून सर्वांच्या गळ्यातील ताईत आ-हेत. त्या दोघांनी मिळून तीर्थयात्रा केली. उत्तरेतील त्यांचा अनुभूतीपूर्ण प्रवास मोठा विस्मयकारी आहे. उत्तरेत त्यांनी वारकरी विचारांचा प्रचार-प्रसार करतांना न्हावी असणारे संत सेना महाराज यांच्या विच-ाराने प्रभावित होऊन पंढरीत येऊन राहिले. संत सेना महाराजांनी वारकरी समता-मम तेची परंपरा उत्तरेत नेतांना जाती-धर्माच्या पलीकडील वारकरी संप्रदाय आपलासा केला. नामदेव-ज्ञानदेव जोडीने खऱ्या अर्थाने वारकरी संप्रदाय महाराष्ट्राच्या बाहेर पोहोचवण्याचे कार्य केले. याच अनुषंगाने संत नामदेव यांच्या गाथ्यातील तीर्थावळी हे अभंग प्रकरण मोठे मोलाचे आहे.

दुसरीकडे नामदेवांचे जिवलग असणारे संत ज्ञानदेव जेंव्हा समाधी घेण्याचे जाहीर करतात तेंव्हा नामदेव प्रचंड दुःखी होतात. त्यातूनच नामदेवांचे आपला जिवलग संत ज्ञानदेवांच्या समाधीचे अभंग वाचतांना डोळ्याला धारा लागतात. सर्वच वारकरी संतांची मांदियाळी श्री विठ्ठल-रुक्मिणी सोबत त्यांचा प्राणसखा ज्ञानराज माउली समाधिस्त होत आहे यामुळे अतीव दुःखी आहे. यातूनच अत्यंत दुःखी, कष्टी झालेले ज्ञानदेवांचे जिवलग मित्र संत नामदेव

देव निवृत्ति यांनी धरिले दोन्ही कर ।
जातो ज्ञानेश्वर समाधीसी ।।१।।
ज्ञानदेव म्हणे सुखी केलें देवा ।
पादपद्मीं ठेवा निरंतर ।।५।।
तीन वेळां जेव्हां जोडिलें करकमळ ।
झांकियेले डोळे ज्ञानदेवें ।।६।।
भीममुद्रा डोळा निरंजनीं लीन ।
जालें ब्रह्मपूर्ण ज्ञानदेव ।।७।।
नामा म्हणे आतां लोपला दिनकर ।
बाप ज्ञानेश्वर समाधिस्थ ।।८।।

असे मित्राच्या, ज्ञानाच्या विरह दुःखाने ओतप्रोत असणारे ७२ अभंग लिहून केवळ रडत राहतात. त्यांना ज्ञानदेवांचा वियोग असह्य झाला आहे. मित्र कसा असावा याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे नामदेव-ज्ञानदेव! असा हे महान युवा संत ज्ञानदेव समाधिस्त होतात आणि नामदेव एकटे पडतात. याचा परिणाम म्हणजे ते महाराष्ट्र सोडून उत्तरेत जातात.

आज अलंदीप ज्ञानराज माउली जाऊन जवळपास ७२९ वर्षांचा महाकाय काळ लोटला असतांना माउली तिळभरही महाराष्ट्र सृजनांच्या विस्मरणात गेले नाहीत. त्यांची अलौकिक गगनगामी प्रज्ञा, प्रतिभा आजही मराठी भाषेला ललामभूत करत अजरामर आहे. आज बोलणाऱ्या लोकांनी सर्वच वारकरी संतांच्या लेखनावर आपल्या क्स्जामातेने लेखन करून त्यांचा समता-ममता विचार समाजच्या तळापर्यंत नेऊन पोहोचवावा लागेल. अशा प्रज्ञावंत, ज्ञानमूर्ती महामानवांस समाधीदिनी कोटी कोटी वंदन!

-प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय,
सोनपेठ, जि. परभणी
मो. ९१५८०६४०६६८

# मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करणारे बाळासाहेब ठाकरे

आज १७ नोव्हेंबर. आजच्याच दिवशी म्हणजे १७ नोव्हेंबर २०१२ रोजी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मराठी माणसाला पोरके करून कायमचे निघून गेले. आज त्यांची दहावी पुण्यतिथी. २३ जानेवारी १९२६ रोजी जन्मलेल्या बाळासाहेबांना समाजकार्याचे बाळकडू आपल्या वडिलांकडून म्हणजे प्रबोधनकारांकडून लहानवयातच मिळाले. प्रबोधनकारांच्या प्रबोधनाचा, पुरोगामी विचारांचा व आक्रमक वृत्तीचा वारसा बाळासाहेबांमध्येही कळत नकळतपणे उतरला. सर्वप्रथम एक कलाकार, एक व्यंगचित्रकार म्हणून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली.



१९५० साली ते फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. फ्री प्रेस जर्नल-मध्ये व्यंगचित्रकार म्हणून काम करत असतानाच बाळासाहेब विविध संस्थांसाठी, कंपन्यांसाठी व नियतकालिकांसाठी व्यंगचित्रकार तसेच जाहिरात डिझाईनचे कामही करत. याच काळात त्यांची आर. के. लक्ष्मण या विख्यात व्यंगचित्रकाराशी ओळख झाली. लवकरच या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. ही मैत्री शेवटपर्यंत टिकून राहिली. आर. के. लक्ष्मण आणि बाळासाहेब ठाकरे या दोघांनी व्यंगचित्रकलेला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. आज व्यंगचित्रकार म्हटले की याच दोघांची नावे समोर येतात. फ्री प्रेस जर्नलमध्ये काही काळ काम केल्यानंतर बाळासाहेबांनी स्वतःचे साप्ताहिक काढण्याचे ठरवले. बाळासाहेब स्वतः व्यंगचित्रकार होते त्यामुळे हे साप्ताहिक व्यंगचित्रात्मकच होते हे वेगळे सांगायला नको. ऑगस्ट १९६७ साली बाळासाहेबांनी 'मार्मिक' हे साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाला मार्मिक हे नाव प्रबोधनकारांनी सुचवले.

ऑगस्ट १९६७ मध्ये महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते मार्मिकच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन झाले. महाराष्ट्राच्या उद्धारासाठी आणि मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी सुरू करण्यात आलेले मार्मिक आजही तितक्याच जोमात सुरू आहे. बाळासाहेबांनी ज्या उद्देशाने हे साप्ताहिक सुरू केले होते तो उद्देश सफल झाला असेच म्हणावे लागेल. मराठी माणसांच्या मुंबईतच मराठी माणसांवर होणाऱ्या अन्यायाला मार्मिकने वाचा फोडली. महाराष्ट्रातच मराठी माणसांची गळचेपी होऊ लागली. मराठीवर अन्याय होऊ लागला. हा अन्याय केवळ व्यंगचित्रांच्या फटकाऱ्याने दूर होणार नाही त्यासाठी आणखी संघटित प्रयत्न करायला हवेत असा विचार बाळासाहेबांच्या मनात आला. बाळासाहेबांनी मराठी माणसांना एक करून मोठे संघटन उभारले. या संघटनेला कोणते नाव द्यायचे असे बाळासाहेबांनी प्रबोधनकारांना विचारले. प्रबोधनकारांनी क्षणाचाही विलंब न करता नाव घेतले 'शिवसेना'. यानंतर बाळासाहेबांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची अधिकृत स्थापना केली. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे ब्रीद घेऊन स्थापन झालेल्या शिवसेनेत तरुणांचा भरणा सुरू झाला. गाव तिथे शाखा असा प्रवास करत अल्पावधीतच शिवसेना महाराष्ट्रभर पसरली. गावागावांत, खेड्यापाड्यांत शिवसेनेच्या शाखा स्थापन झाल्या.

शिवसेनेचा पहिला मेळावा ३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवतीर्थ मैदानावर संपन्न झाला. या मेळाव्यापासून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवतीर्थावरील (शिवाजीपार्क) मराठी माणसांची प्रचंड गर्दी असे समीकरणच तयार झाले. शिवतीर्थावर बाळासाहेबांचे भाषण ऐकण्यासाठी राज्यभरातून लोक येत. त्यांच्या वक्तृत्वाने उपस्थित जनसमुदाय भारावून जात. वक्तृत्वाबरोबरच भेदक लेखणी हे देखील बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे महत्वाचे वैशिष्ट्ये. बाळासाहेबांनी सामना सुरू केल्यावर या लेखणीची ताकद देशाला समजली. सामनामधील बाळासाहेबांच्या अग्रलेखांची वाट पूर्ण महाराष्ट्र पाहात असे. १९९५ साली बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रभर झंझावती प्रचार केला. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी प्रचारसभा घेतल्या. त्यांच्या सभेला लाखोंची गर्दी होऊ लागली. आपल्या आक्रमक भाषणांनी सत्ताधारी पक्षाला त्यांनी सळो की पळो करून सोडले. बाळासाहेबां-मुळेच शिवसेना-भाजप युतीचे सरकार महाराष्ट्रात स्थापन झाले. मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. या सरकारने एक रुपयात झुणका भाकर, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपडपट्टीवासीयांना घरे, मुंबई-पुणे हायवे, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बेचे मुंबई नामांतर असे अनेक लोकहिताचे निर्णय घेतले. या सर्व योजना प्रकल्पांची मूळ संकल्पना बाळासाहेबांचीच होती. आज मुंबई महाराष्ट्रात आहे याचे सर्व श्रेय बाळासाहेबांना जाते. बासाहेबांमुळेच मुंबई महाराष्ट्रात आणि मराठी माणूस मुंबईत दिमाखात राहू शकतो. बाळासाहेब नसते तर मुंबई परप्रांतीयांच्या घशात आणि मराठी माणूस मुंबईच्या बाहेर गेला असता. बाळासाहेबांनीच मराठी माणसाला स्वाभिमानाने जगायला शिकवले. बाळासाहेबांमुळेच मराठी माणूस आज ताठ मानेने जगत आहे. मराठी माणसांसाठी त्यांनी जे केले ते इतर कोणत्याही नेत्याला करता आले नाही. म्हणूनच मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. आज त्यांच्या पुण्यतिथी दिनी महाराष्ट्रातील तमाम मराठी माणूस त्यांना अभिवादन करत आहे. मराठी माणसांच्या मनात स्वाभिमान जागृत करणाऱ्या बाळासाहेबांना विनम्र अभिवादन!


-श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# पंजाब केसरी लाला लजपत राय

लाला लजपतराय यांचा जन्म २८ जानेवारी १८३६ रोजी पंजाबमधील धुंढिक येथे झाला. ते पंजाबी, भारतीय राजकारणी व लेखक होते. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी योगदान दिले. लाल-बाल-पाल या त्रिकुटापैकी लाल म्हणजे लाला लजपत राय हे होते. ते जहालमतवादी नेते होते. त्यांना पंजाब केसरी असे म्हणतात. त्यांनी पंजाब नॅशनल बँकेची स्थापना केली.

लाला लजपतराय यांचे वडील मुन्शी राधाकृष्ण अग्रवाल सरकारी शाळेत उर्दू आणि पर्शियनचे शिक्षक होते. त्यांच्या आईचे नाव गुलाबदेवी अग्रवाल होते. १८४९ मध्ये लाला लजपतरायांचा विवाह राधादेवींशी झाला. १८७० च्या दशकाच्या उत्तरार्धात त्यांच्या वडिलांची बदली रेवरी येथे झाली. तेथील सरकारी उच्च माध्यमिक शाळेत लजपतरायांचे सुरुवातीचे शिक्षण झाले.

सुरुवातीच्या आयुष्यात लज-पतराय यांचे उदारमतवादी विचार आणि हिंदुत्वावरील त्यांचा विश्वास त्यांचे वडील आणि अतिशय धार्मिक आई यांच्यामुळे तयार झाला. १८८० मध्ये लजपतरायांनी कायद्याचा अभ्यास करण्यासाठी लाहोर येथील सरकारी महाविद्यालयात प्रवेश घेतला. येथेच ते देशभक्त आणि भविष्यातील स्वातंत्र्यसैनिक लाला हंसराज आणि पंडित गुरुदत्त यांच्या संपर्कात आले. लाहोरमध्ये शिकत असताना स्वामी दयानंद सरस्वतींच्या हिंदू सुधारणा चळवळीचा



प्रभाव त्यांच्यावर पडला आणि ते आर्यसमाजाचे सदस्य बनले. तसेच लाहोर स्थित आर्य गॅझेटचे संस्थापक, संपादक बनले.

हिंदुत्वावरील वाढत्या विश्वासामुळे ते हिंदू महासभेत सामील झाले. त्यामुळे त्यांना नौजवान भारत सभेच्या टीकेला सामोरे जावे लागले. कारण ही महासभा धर्मनिरपेक्ष नव्हती. भारतीय उपखंडातील हिंदू जीवनपद्धतीवर लक्ष केंद्रित केल्या-मुळे पुढे भारतीय स्वातंत्र्यासाठीच्या यशस्वी आंदोलनासाठी त्यांनी शांततामय मार्गाने चळवळी केल्या. १८८४ मध्ये त्यांच्या वडिलांची बदली रोहतक येथे झाली आणि लाहोर येथील अभ्यास संपवून लजपतरायसुद्धा त्यांच्या बरोबर आले. १८८६ मध्ये ते वडिलांच्या बदलीबरोबर हिसारला आले आणि तेथे त्यांनी वकिलीचा व्यवसाय सुरू केला. बाबू चुडामणींसह लजपतराय हिसारच्या बार कौन्सिलचे संस्थापक सदस्य बनले.

लहानपणापासूनच देशसेवा करण्याची राय यांची तीव्र इच्छा होती. त्यामुळे देशाची पारतंत्र्यातून सुटका करण्याची लजपतरायांनी शपथ घेतली. त्याच वर्षी त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची हिसार जिल्हा शाखा स्थापन केली. तसेच बाबू चुडामणी, चंदूलाल तयाल, हरी-लाल तयाल आणि बालमुकुंद तयाल हे तयाल बंधू, डॉ. रामजीलाल हुडा, डॉ.धनीराम, आर्यसमाजी पंडित मुरारीलाल, शेठ छाजूराम जाट आणि देवराज संधीर यांच्याबरोबर लाला लजपतरायांनी आर्य समाजाची स्थापनासुद्धा केली. काँग्रेसच्या अलाहाबाद येथील वार्षिक अधिवेशनात हिसार जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी त्यांची १८८८ आणि १८८९ मध्ये निवड झाली. १८९२ मध्ये उच्च न्यायालयात वकिली करण्यासाठी ते लाहोर येथे गेले. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी भारताच्या राजकीय धोरणाला आकार देण्यासाठी ते पत्रकारितासुद्धा करत. त्यांनी द ट्रिब्यून सहित अनेक वृत्तपत्रांमध्ये नियमितपणे लेखन केले.

१८८६ मध्ये त्यांनी महात्मा हंसराज यांना लाहोरमध्ये दयानंद अंग्लो-वैदिक स्कूलची स्थापना करण्यास मदत केली. भारताच्या १९४७ साली झालेल्या फाळणीनंतर लाहोरमधील या विद्यालयाचे रूपांतर इस्लामिया कॉलेजमध्ये झाले.

१९१४ मध्ये स्वातंत्र्यलढ्यात योगदान देण्यासाठी लजपतरायांनी वकिलीला राम राम ठोकला. ऑक्टोबर १९१७ मध्ये त्यांनी न्यूयॉर्कमध्ये भारतीय होमरूल लीगची स्थापना केली.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सहभागी झाल्यानंतर आणि पंजाबमधील राजकीय निदर्शनामध्ये भाग घेतल्यानंतर, मे १९०७ मध्ये कोणताही खटला न चालवता लाला लजपतरायांची ब्रह्मदेशातील मंडालेच्या तुरुंगात रवानगी करण्यात आली. पण त्यांना अटक करून ठेवण्यासाठी पुरेसा पुरावा नाही, असे लॉर्ड मिंटो यांनी ठरवल्याने नोव्हेंबरमध्ये त्यांना परत जाण्याची परवानगी देण्यात आली.

१९२० साली कोलकाता येथे भरलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या खास अधिवेशनात ते अध्यक्ष म्हणून निवडून आले. १९२१ मध्ये त्यांनी लाहोरमध्ये लोक सेवक मंडळ या 'ना नफा' तत्त्वा-वरील कल्याणकारी संघटनेची स्थापना केली. फाळणीनंतर या संस्थेचे कार्यालय दिल्ली येथे हलवण्यात आले. भारतभरात या संस्थेच्या अनेक शाखा आहेत.

१९२८ मध्ये भारतातील राजकीय परिस्थितीबद्दल अहवाल देण्यासाठी सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली ब्रिटिश सरकारने एका आयोगाची स्थापना केली. भारतातील राजकीय पक्षांनी या आयोगावर बहिष्कार घातला, कारण या आयोगाच्या सदस्यां-मध्ये एकही भारतीयाचा समावेश नव्हता. या आयोगाविरुद्ध भारतभर निदर्शने झाली. ३० ऑक्टोबर १९२८ रोजी जेव्हा या आयोगाने लाहोरला भेट दिली, तेव्हा त्याविरुद्ध मूक निदर्शनांचे नेतृत्व लाला लजपतराय यांनी केले. पोलीस अधीक्षक जेम्स स्कॉट यांनी या निदर्शकांवर लाठी हल्ला करण्याचे आदेश दिले. जखमी होऊनसुद्धा लाला लजपतरायांनी या जमावासमोर भाषण केले. आज मी ज्या लाठ्या खाल्ल्या, त्या म्हणजे ब्रिटिश सरकारच्या भारतातील राजवटीच्या शवपेटिकेवरील शेवटचे खिळे ठरतील, असे मी जाहीर करतो. हे त्यांचे त्यावेळचे उद्गार होते. निदर्शनांच्या वेळेला झालेल्या लाठी हल्ल्यातून लाला लजपतराय पूर्णपणे बरे झाले नाहीत आणि हृदय विकाराच्या धक्क्याने १७ नोव्हेंबर १९२८ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन

-नासा येवतीकर
विषय शिक्षक,
कन्या शाळा धर्माबाद
मो. ९४२३६२५७६९

## थोडक्यात...

### पदवीधर मतदारसंघाच्या मतदार नोंदणीसाठी नमून-१८ च्या अर्जावर कार्यवाही करण्याच्या कालावधीत वाढ

**नांदेड (प्रतिनिधी)**– उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे १४ नोव्हेंबर, २०२५ पत्रान्वये पदवीधर मतदारसंघाच्या मतदार नोंदणीसाठी नमून-१८ च्या अर्जावर कार्यवाही करण्यासाठी तारीख वाढवून दिली असून सुधारित कार्यक्रम जाहिर केला आहे. हस्तलिखीते तयार करणे व प्रारुप मतदार याद्यांची छपाई दिनांक २८ नोव्हेंबर, २०२५, प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी दिनांक ०३ डिसेंबर, २०२५, दावे व हरकती स्विकारण्याचा कालावधी दिनांक ०३ ते १८ डिसेंबर, २०२५, दावे व हरकती निकाली काढण्याचा दिनांक व पुरवणी यादी तयार करणे व छपाई करणे दिनांक ०५ जानेवारी, २०२६, मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी दिनांक १२ जानेवारी, २०२६ असा केला असल्याचे मतदार नोंदणी अधिकारी ५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ जितेंद्र पापळकर यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

# ६४ व्या मराठी हौशी राज्य नाट्य स्पर्धेचे उद्घाटन

## ‘उद्रेक’ नाटकापासून राज्य नाट्य स्पर्धेला सुरूवात



**नांदेड (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित ६४ वी हौशी राज्य नाट्य स्पर्धेला रविवारी (ता.१६) सुरुवात झाली. नांदेड केंद्रावर ’उद्रेक’ या नाटकापासून थाटात राज्य नाट्य स्पर्धेची सुरूवात झाली. पुढील १० दिवस नांदेडकरांना सांस्कृतिक मेजवणी मिळणार आहे.

कुसुम सभागृहात रविवारी सायंकाळी सात वाजता राधिका वाळवेकर (जेष्ठ रंगकर्मी), गोविंद जोशी (जेष्ठ रंगकर्मी), परीक्षक अविनाश कोल्हे, ऍडव्होकेट प्रतिभा तेटू, प्रकाश खोत तसेच रंगकर्मी राहुल जोंधळे यांच्या उपस्थति स्पर्धेचे उदघाटन करण्यात आले. त्यानंतर लेखक रविशंकर झिंगरे लिखित मधुकर उमरीकर दिग्दर्शित उद्रेक’ हे परभणी येथील अष्टविनायक कला व क्रीडा आणि सेवा प्रतिष्ठान निर्मिती असलेल्या नाटकाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी रसिक चांगलेच भारावून गेले होते.

आज दि. १७ नोव्हेंबर रोजी सादर होणारे ’भयरात्र’ हे नाटक काही अपरिहार्य कारणामुळे रद्द झाले आहे. उद्या दी. १८ नोव्हेंबर रोजी विजय करभाजन लिखित आणि सुनीता करभाजन दिग्दर्शित ’ते दिवस’ हे नाटक सादर होणार आहे तरी सर्व नाट्य रसिकांनी याची नोंद घ्यावी असे नमूद करण्यात आले आहे.

# हिमायतनगरमध्ये डॉ.राजेंद्र वानखेडे कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये



नांदेड (प्रतिनिधी)– माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून हिमायतनगर येथे वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रात कार्यरत डॉ. राजेंद्र वानखेडे यांनी कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे.

माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत सुभाष बलपेलवाड, रुपेश ढोणे, विकास ढोणे, लक्ष्मीकांत ढोणे, साईड ढोणे, पवन ढोणे, राजू ढोणे, ओंकार बजेवाड, शैलेश तोटेवाड , पोशट्टी जाधव, प्रफुल्ल मुधळकर, मंगेश ढोणे, ओंकार पारडकर,नीलकंठ पवार, मारुती सुरोशे इत्यादी कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश केला आहे. खा.अशोकराव चव्हाण यांनी या डॉ.राजेंद्र वानखेडे यांच्यासह भारतीय जनता पक्षात आलेल्या सर्व प्रमुख कार्यकर्त्यांचे स्वागत केले. यावेळी नांदेडचे महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर, भाजपाचे उत्तर जिल्हा ग्रामीण अध्यक्ष किशोर देशमुख, स्थायी समितीचे माजी सभापती किशोर स्वामी, डॉ.अंकुश देवसरकर आदींची उपस्थिती होती.

# रामराव महाराज सभागृहाचे आज भूमिपूजन; देवसरकर यांची माहिती



**नांदेड (प्रतिनिधी)** – राज्य शासनाच्या वसंतराव नाईक तांडा वस्तीसुधार योजनेअंतर्गत भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांच्या पुढाकारातून मंजूर झालेल्या संत श्री रामराव महाराज सभागृहाचे भूमिपूजन पैनगंगा सेवादास नगर माहुरगड येथील संस्थानचे श्री संत दीक्षागुरु प्रेमसिंग महाराज यांच्या शुभहस्ते उद्या सोमवार दिनांक १७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता रामूनाईक तांडा, वाळकी बुद्रुक येथे होणार असल्याची माहिती भाजप तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांनी दिली आहे.

नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे बहुजनविकास मंत्री अतुल सावे, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या प्रयत्नातून संत श्री रामराव महाराज सभागृहासाठी १० लक्ष रुपयाचा निधी मंजूर झाला आहे, भूमिपूजन सोहळ्याला परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रामुनाईक तांडा येथील नाईक, कारभारी व समस्त गावकरी मंडळी यांनी केले आहे.

# आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या उपस्थितीत देगलूरमधील अनेक कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी प्रवेश



**नांदेड (प्रतिनिधी)** – नगरपरिषद निवडणुकीच्या धामधुमीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्षप्रवेश सोहळे सुरू आहेत. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या उपस्थितीत देगलूर येथील असंख्य कार्यकर्त्यांनी आज आ. चिखलीकर यांच्या साई सुभाष या संपर्क कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर रित्या प्रवेश केला आहे.

साई सुभाष जनसंपर्क कार्यालय वसंतनगर नांदेड येथे देगलूर तालुक्यातील संजय नागोराव लोखंडे, गंगाधार मारोती बोयावार, कलीम मैनोदीन शेख, शेख हैदर इब्राहिम, शिवराज भिमराव बोयावार, हैदर चांदसाब शेख, देविदास दत्ता काकेवार, राजेश गोविंदराव कोकणे, भगवानराव इरवंतराव पाटील, प्रकाश विठ्ठलराव पाटील, मारोती नागनाथ परबते, सुरेश मल्लू येन्नलवार, यशवंत गोविंदराव राजुरे, शंकर विश्वनाथ आगलावे, माधव एकनाथराव इंगळे, शिवराज शंकराव कोनेरे, हणमंत नागोराव इंगळे, भारत पुंडलिक मुरगे, वसंत लक्ष्मण येन्नलवार, हणमंत बसवंत येन्नलवार, दिंगाबर अशोक बकन्नवार, गोविंद नागनाथ लाळे, हणमंत गंगाधर कोनेरे, शंकर हणमंत लाळे, भास्कर गणपत घरडे, हणमंराव आगलावे, त्रिमुर्ती दत्तात्रय पांचाळ, कृष्णा मचिंद्र केरले, पंढरी तुळशिराम इंगळे, माधवराव संभाजीराव विभुते, शंकर माधवराव विभुते, शेफिक उमर साहब, अशिफ हाजि साहब धनजकर, लतीफ मीया साहब,कपिल शंकरराव विभुते, गजानन बाबुराव हेंन्टे, माधवराव गंगाराम विभुते, शिवाजी माधवराव इंगळे, यादवराव नागनाथ इंगळे, वसंत पुंडलीक खुशोबा, देविदास बापुराव राजूरे, दिलिप कोंडीबा वाघमारे, बळीराम रामा वाघमारे, शिवा वसंत विभुते, शंकर लक्ष्मण दुडलवार, बालाजी माधवराव भंडारे, दत्ता पांचाळ, शंकर मैलापुरे, शिदराम यन्नलवार, मारोती शिवा कैकाडी, बजरंग मेंडकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश केला. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी यावेळी पक्षप्रवेश केलेल्यांचे स्वागत करत पक्ष वाढीसाठी तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी दिलीपराव धर्माधिकारी, उदय चव्हाण, अंकुश देसाई, शिवाजीराव कणकट्टे, यादवराव देसाई, बालाजीराव शिंदे, राहुल देसाई, मंगल देसाई, गजानन पाटील, बालाजीराव भूतणारे, माधवराव पाटील, मोहित पाटील सुगावकर, सूर्यवंशी साहेब यशवंत पाटील यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.

# वसरणी परिसरातील अनेक महिलांचा शिवसेनेत प्रवेश; आ.बोंढारकर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील वसरणी भागातील व परिसरातील अनेक महिलांनी आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला. यावेळी शिवसेना महिला पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.

यावेळी शिवसेना शिंदे गटात लाडक्या बहिणींचा पक्ष प्रवेश म्हणजे पक्षात सामाजिक राजकारण, सामाजिक कार्य असल्याचे सांगून पक्ष हितासाठी सक्रीय राहून कार्य करावे असे आवाहन नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघाचे आमदार आनंदराव पाटील बोढारकर यांनी वसरणी येथील आयोजित महिला पक्ष प्रवेश सोहळा प्रसंगी केले.

शिवसेनेचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार उपनेते हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर, दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे, महिला संपर्क प्रमुख सौ. लक्ष्मीताई नरहिरे, यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटाचे सिडको शहरप्रमुख सुहास पाटील खराणे यांच्या वतीने १४ नोव्हेंबर रोजी आयोजित वसरणी येथील शंकरनगर भागातील महिलांनी पक्षप्रवेश केला. नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना आ.आनंदराव पाटील बोंढारकर, दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे, युवासेना दक्षिण जिल्हा प्रमुख बाळु पाटील मोरे, दक्षिण शहरप्रमुख तुलजेश यादव, तालुका प्रमुख उद्धव पाटील शिंदे, एसटी सेलचे जिल्हाध्यक्ष भालचंद्र मोळके, वसरणी येथील महिला कार्यकर्त्यां सौ.अन्नपूर्णा शामराव खराणे, महिला संपर्क प्रमुख सौ.लक्ष्मी नरहिरे, जिल्हा प्रमुख महिला आघाडीच्या जिल्हा प्रमुख सौ.वनमाला ताई राठोड, गिता पुरोहित, तालुका महिला प्रमुख स्नेहा ताई पाटील, उपजिल्हा प्रमुख सौ.गवळणताई येवले, शहरप्रमुख सौ.चिंचोलकर ताई यांच्या सह पदाधिकारी मान्यवर पदाधिकारी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आयोजक सुहास पाटील खराणे यांनी प्रास्ताविक मध्ये वसरणी भागातील शंकरनगर भागातील पुरग्रस्त बांधीत नागरीकांना आर्थिक मदत व परिसरातील विविध भागात रस्ते, पाणी, दिवाबत्ती यासह अनेक समस्या सोडल्या असल्याचे सांगून परिसरात अंगणवाडी तात्काळ मंजूर करून दिला असल्याचे सांगितले.

यावेळी परिसरातील महिला सौ. जोत्स्ना गणेश बटवाले, सौ. कोमल सचिन सोगे, सौ.रसिका ब्रम्हणवाडेकर, सौ.मनीषा भीम सोगे, सौ.संगीता मनोज रोतरे, सौ. गीता कुरील, सौ.ज्योती गजानन शास्त्री, सौ. छायाबाई धुलदाणी, सौ.ज्योती डूबुकवाड,सौ.अश्विनी वावधने यांच्यासह अनेक महिलांनी तर पुरुष मध्ये गजानन शास्त्री, रमेश रोत्रे, मुकेश ठाकूर, रितेश जाधव यांचा पक्ष प्रवेश झाला. यावेळी महिला शिवसेना पदाधिकारी म्हणून दीक्षा वंजे, कोमल सचिन सोगे, योगिता गजेंद्र ठाकूर, ज्योत्स्ना गणेश बटवाले, सुरेखा बालाजी माने, यांना नियुक्ती पत्र देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सुत्रसंचलन सचिन खराणे, आभार प्रदर्शन भालचंद्र मोळके यांनी केले. या महिला पक्ष प्रवेश सोहळयास परिसरातील अनेक महिलांची उपस्थिती होती. पक्ष प्रवेश सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी सुधाकर भिसे, बाबु ठाकूर, बालाजी मोरे यांच्यासह पदाधिकारी व शिवसैनिक यांनी परिश्रम घेतले.

# शिवसेना (ठाकरे गट) नांदेड दक्षिण अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुखपदी युसुफ पठाण यांची नियुक्ती



**नांदेड (प्रतिनिधी)** – शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या अल्पसंख्यांक विभाग नांदेड दक्षिण जिल्हाप्रमुखपदी युसुफ खान चांदखान पठाण यांची नियुक्ती शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे, शिवसेना मराठवाडा संपर्क नेते अंबादास दानवे, नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख बबनराव थोरात यांच्या आदेशाने शिवसेना जिल्हाप्रमुख भुजंग पाटील यांनी केली आहे.

युसुफ खान पठाण हे मागील ३५ वर्षांपासून शिवसेनेशी एकनिष्ठ आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या अल्पसंख्यांक विभाग नांदेड दक्षिण जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख भुजंग पाटील यांनी शुक्रवारी युसुफ खान पठाण यांना नियुक्तीपत्र दिले. यावेळी शिवसेना सहसंपर्कप्रमुख दयाल गिरी, विजय ढगे यांची उपस्थिती होती. पठाण यांच्याकडे नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघ व नायगाव विधानसभा मतदार संघाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.


**CHANGE IN NAME**

My old name Sayyad Kausar Jahan which now I am changing as New Name Kauser Jahan Sayyad Mastan

Hence forth my all correspondance will be done as per my New Name. Please consider the same.

**:: Address ::**
P. 84 Omer Colony Nanded
MAHARASHTRA-431604
Mobile No. 9822496887

**CHANGE IN NAME**

My old name Sayyad Mastan which now I am changing as New Name Sayyad Mastan Kasim

Hence forth my all correspondance will be done as per my New Name. Please consider the same.

**:: Address ::**
P. 84 Omer Colony Nanded
MAHARASHTRA-431604
Mobile No. 9822496887

**CHANGE IN NAME**

My old name **Sayyad Faizan** which now I am changing as New Name Sayyad Faizan Mastan

Hence forth my all correspondance will be done as per my New Name. Please consider the same.

**:: Address ::**
P. 84 Omer Colony Nanded
MAHARASHTRA - 431604
Mobile No. 9822496887


**नमुना ई - ४ (नियम १९ पहा)**

**निवडणुक निर्णय अधिकारी :- श्री. एस.बी. मंगनाळे, पदनाम:- कार्यालय अधिक्षक संलग्न जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड.**
**सहकारी संस्थेचे नांव :- विद्या जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्था म. जि. नांदेड** **(अंतिम मतदार यादी प्रसिध्दी दि. १८/०८/२०२५)**

महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ च्या नियम १९ प्रमाणे अधिकारांचा वापर करुन आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी जाहीर केलेल्या उपरोक्त सहकारी संस्थेच्या सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठीचा निवडणूक कार्यक्रम मी **श्री. एस.बी. मंगनाळे, निवडणूक निर्णय अधिकारी, विद्या जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्था म. जि. नांदेड** तथा **कार्यालय अधिक्षक संलग्न जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड**, मा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी आणि मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पूर्व मान्यतेने जाहीर करीत आहे. सदर कार्यक्रमातील विविध टप्पे, संबंधीत संस्थेचा मतदारसंघ अथवा मतदार संघानुसार खालील अनुसूचीप्रमाणे जाहीर करीत आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. | मतदार संघाचे नांव | | नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यासाठीचा शेवटचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा) | प्राप्त नामनिर्देशन पत्रांची यादी प्रसिध्द करणे | नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचा दिनांक | विधीग्राहय नामनिर्देशन पत्राची सूची प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवाराने नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक | नामनिर्देशन पत्रांची चिन्हासह अंतिम यादी प्रसिध्द करणे | मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक, वेळ व मतदानाचे स्थळ | मतमोजणीची दिनांक, वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल घोषीत करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | १. सर्वसाधारण खातेदार कर्जदार प्रतिनिधी | १० | दि. १७/११/२०२५ ते २१/११/२०२५ स. ११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत (जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, भुविकास बँक इमारत दुसरा मजला,नांदेड) | दि. १७/११/२०२५ ते २१/११/२०२५ जसे प्राप्त होतील त्याप्रमाणे रोज सायं. ४.०० वा. (जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, भुविकास बँक इमारत दुसरा मजला,नांदेड) | दि. २४/११/२०२५ सकाळी ११.३० पासून छाननी संपेपर्यंत (जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, भुविकास बँक इमारत दुसरा मजला,नांदेड) | दि. २५/११/२०२५ सकाळी ११.३० वाजता (जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, भुविकास बँक इमारत दुसरा मजला,नांदेड) | दि. २५/११/२०२५ ते ०९/१२/२०२५ स. ११.०० ते दु. ३.०० वाजे पर्यंत (जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, भुविकास बँक इमारत दुसरा मजला,नांदेड) | दि. १०/१२/२०२५ सकाळी ११.३० (जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, भुविकास बँक इमारत दुसरा मजला,नांदेड) | दि. २१/१२/२०२५ स. ८.०० ते सांय. ४.०० वाजेपर्यंत मतदानाचे ठिकाण ((जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, भुविकास बँक इमारत दुसरा मजला,नांदेड) | दि. २१/१२/२०२५ मतदान संपल्यानंतर लगेच ठिकाण (जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, भुविकास बँक इमारत दुसरा मजला,नांदेड) | दि. २१/१२/२०२५ मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर लगेचच (जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, भुविकास बँक इमारत दुसरा मजला,नांदेड) |
| | २. अनूसुचीत जाती/जमाती प्रतिनिधी | १ | | | | | | | | | |
| | ३. महिला प्रतिनिधी | २ | | | | | | | | | |
| | ४. इतर मागास प्रवर्ग मतदार संघ | १ | | | | | | | | | |
| | ५. भटक्या विमुक्त जाती / जमाती / विशेष मागास प्रवर्ग | १ | | | | | | | | | |
| | एकूण | १५ | | | | | | | | | |

**टिप — १) स्तंभ क्रं. ६ व ८ मध्ये विनिर्दिष्ट केलेली यादी संबधीत संस्थेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली जाईल. २) संस्थेची मतदार यादी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयामध्ये विकत मिळेल.**
**३) निवडणूक कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेल्या चिन्हांच्या यादीमधून चिन्हे निवडावयाचे आहे. ४) निवडणूक चिन्हाचे वाटप स्तंभ ८ मधील तारखेस व ठिकाणी सकाळी ११.३० वाजता करणेत येईल. ५) नामनिर्देशन पत्राची छाननी केल्यानंतर त्यांची प्रसिध्दी, मतदान व मतमोजणी दिवस वगळुन निवडणुक कार्यक्रम शासकीय / सार्वजनिक सुटयांखेरीज सुरु राहील.**
**६) निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय पत्ता :** ((जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालय, भुविकास बँक इमारत दुसरा मजला,नांदेड))

(स्वाक्षरीत)
**निवडणुक निर्णय अधिकारी**
**विद्या जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्था म. जि. नांदेड**

(स्वाक्षरीत)
**जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी नांदेड तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड.**

(स्वाक्षरीत)
**सचिव, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस व संबधीतास या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते कि, माझे पक्षकार हणमंत नरसिंगराव जाधव यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून खालीलप्रमाणे जाहीर प्रगटन प्रसिद्ध करत आहे. हे कि, माझे पक्षकार यांनी अक्षय विजयकुमार जाजु रा. नांदेड ता.जी.नांदेड यांच्या जाती व मालकी व कब्जातील मौजे कोठा ता.जी. नांदेड नांदेड वाघळा महानगरपालिका हद्दीतील, शेत गट .न.२२९ पैकी प्लॉट क्र.०९ ज्याची लांबी पुर्व-पश्चिम दक्षिणेकडून २१.६० मी. व उत्तरेकडून २२.३५ मी. आणि रुंदी दक्षिण-उत्तर पूर्वेकडून १३.९५ मी. व पश्चिमेकडून १३.९३ मी. ज्याचे एकूण क्षेत्रफळ ३०९.७० चौ. मी. असून ज्याच्या चतुसिमा पुर्वेस: ९.०० मी. रोड, पश्चिमेस: गट क्र. २२८,दक्षिणेस: ओपन स्पेस व उत्तरेस:नियोजित १५.०० मी. रुंद रोड. येणेप्रमाणे चतुसिमेतील प्लॉट विकत घेण्याचा करार /सौदा चिठ्ठी अक्षय विजयकुमार जाजु रा. नांदेड ता.जी.नांदेड यांच्यासोबत केली असून. सदरील सौदाचीठी आधारे माझे पक्षकार १)जयेश चक्करवार, २)श्री. बोधनकर, ३)ज्ञानेश्वर सोपाणराव जाधव,४) सुभाषराव नागोराव कल्याण आणि ५) राजू शरणअप्पा गंदीगुडे यांना सदरील प्लॉट विकणार असूनलवकरच सौदा चीठी आपल्या हक्कात करणार आहेत.

तरी सर्व सबंधीत्तास या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते कि, वरील नमूद प्लॉटवर कोणाचाही कसल्याही प्रकारे उजर, हक्क, आक्षेप, हरकत असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध तारखेपासुन सात (७) दिवसाच्या आत मूळ कागदपत्रासह खालील पत्यावर हरकत नोंदवावी,मुदत संपल्यानंतर कोणाचाही आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार सदरील घराचा व्यवहार आपल्या हक्कात विक्रीखत करून घेतील करिता हे जाहीर प्रगटन.

मार्फत
**अँड अनिल व्ही.नांदेडकर**
नवीन मोंढा,नांदेड. मो.९८२२५३५८३५

# प्रगतीमंत्र

# लॉ ग्रॅज्युएट्ससाठी 30 नोव्हेंबरला परीक्षा

## इथे डाऊनलोड करा एआयईबीई ॲडमिट कार्ड

**बार कौन्सिल ऑफ इंडियाने १५ नोव्हेंबर २०२५ रोजी AIBE २० प्रवेशपत्र २०२५ जारी केले आहे. परीक्षेसाठी अर्ज केलेले विद्यार्थी त्यांचे प्रवेशपत्र अधिकृत वेबसाइट allindiabarexamination.com वरून डाउनलोड करू शकतात. परीक्षा ३० नोव्हेंबर रोजी होणार आहे. या परीक्षेबद्दल, परीक्षेच्या पॅटर्नबद्दल आणि प्रवेशपत्र कसे डाउनलोड करायचे याबद्दल जाणून घेऊया...**



### ही परीक्षा का घेतली जाते?

लॉ पदवीधरांसाठी राष्ट्रीय स्तरावरील ही परीक्षा आहे. ती उत्तीर्ण झाल्यास त्यांना प्रॅक्टिस करण्यासाठी प्रमाणपत्र मिळते. अंतिम वर्षाचे विद्यार्थीदेखील या परीक्षेला बसू शकतात.

### प्रवेशपत्र कसे डाउनलोड करावे?

- **उमेदवारांनी प्रथम अधिकृत वेबसाइट, allindia barexamination.com ला भेट द्यावी.**
- **आता, होमपेजवरील AIBE 20 प्रवेशपत्र डाउनलोड लिंकवर क्लिक करा.**
- **तुमचा लॉगिन आयडी आणि पासवर्ड एंटर करा.**
- **आता, सबमिट बटणावर क्लिक करा.**
- **विंडो उघडल्यावर प्रवेशपत्र स्क्रीनवर दिसेल.**
- **ते डाउनलोड करा आणि ते सुरक्षित ठेवा.**

- प्रवेशपत्रात कोणती माहिती असेल? : प्रवेशपत्रात तुमचे नाव, वडिलांचे आणि आईचे नाव, नोंदणी क्रमांक, रोल नंबर, फोटो आणि स्वाक्षरी, परीक्षेची तारीख, वेळ आणि रिपोर्टिंग वेळ, परीक्षा केंद्राचे नाव आणि पत्ता, शहर, कॅटेगिरी (सामान्य/ओबीसी/एससी/एसटी) आणि परीक्षेच्या मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश असेल.
- एआयबीई २० परीक्षा पॅटर्न २०२५ काय आहे? : एआयबीई २० परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन घेतली जाते. या परीक्षेचा कालावधी ३ तास ३० मिनिटे आहे. परीक्षेत १०० वस्तुनिष्ठ प्रश्न असतील आणि एकूण गुण १०० आहेत. कोणतेही नकारात्मक गुण नाहीत. ही परीक्षा हिंदी, इंग्रजी, तेलुगू, तमिळ, कन्नड, मराठी, बंगाली, गुजराती, उडिया, आसामी, पंजाबी, संथाली, नेपाळी, सिंधी, मल्याळम, उर्दू, डोगरी, बोडो आणि मैथिली यासह विविध भाषांमध्ये घेतली जाऊ शकते. सामान्य आणि ओबीसी उमेदवारांसाठी उत्तीर्ण गुण ४५ टक्के आहेत आणि एससी/एसटी/पीडब्ल्यूडी उमेदवारांसाठी ४० टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे.

# बीकॉमनंतर एमकॉम की एमबीए..!



## काय करावे? चांगले पैसे कमविण्याचे मार्ग कोणते?

**कॉमर्सच्या विद्यार्थ्यांसाठी अनेक चांगले करिअर पर्याय आहेत. जर तुम्हाला बीकॉम नंतर एमकॉम किंवा एमबीए करायचे असेल तर योग्य पर्याय निवडणे महत्त्वाचे आहे. चांगला पगार, भविष्यातील नोकरीच्या संधी आणि करिअरची वाढ यावर अवलंबून असते. एमकॉम आणि एमबीए... दोन्ही पदव्युत्तर अभ्यासक्रम आहेत आणि अनेक प्रकारे भिन्न आहेत. येथे, आम्ही तुम्हाला सांगत आहोत की कोणता अभ्यासक्रम जलद रोजगाराकडे नेतो आणि मोठा कमाई करण्यासाठी कोणता चांगला आहे.**

- एम. कॉम कोणासाठी योग्य आहे? : कॉमर्स, फायनान्स, अकाऊंटिंग, टॅक्सेशन किंवा रिसर्च यासारख्या क्षेत्रांमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एम.कॉम (मास्टर ऑफ कॉमर्स) हा सामान्यतः एक चांगला पर्याय आहे. हा एक विशिष्ट पदव्युत्तर अभ्यासक्रम आहे जो अकाउंटिंग, अर्थशास्त्र आणि व्यवसाय अभ्यासाची सखोल समज विकसित करतो. एमकॉम करणाऱ्यांना कर सल्लागार, अकाउंटिंग फर्म, बँका, संशोधन आणि अध्यापन क्षेत्रात नोकऱ्या मिळू शकतात.
- एमबीए कोणासाठी योग्य आहे? : व्यवस्थापन, कॉर्पोरेट क्षेत्र, मार्केटिंग, एचआर, वित्त, ऑपरेशन्स आणि बँकिंग या क्षेत्रात करिअर करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एमबीए (मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन) आदर्श आहे. हा एक व्यावसायिक आणि उद्योग-केंद्रित अभ्यासक्रम आहे जो विद्यार्थ्यांना व्यवस्थापन कौशल्ये, नेतृत्व, संवाद आणि व्यवसाय धोरण शिकवतो.
- पगाराच्या बाबतीत कोणता चांगला आहे? : एमबीए आणि एमकॉममध्ये पगारातही फरक आहे. एमबीए करणाऱ्या विद्यार्थ्यांना एमकॉम करणाऱ्यांपेक्षा जास्त सुरुवातीचे पगार दिले जातात. अहवालांनुसार, एमबीए करणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी ५ ते १० लाख रुपयांचे पगार पॅकेज मिळू शकते. एका उच्च महाविद्यालयातून एमबीए केल्यानंतर, पगार १२ ते २० लाख रुपयांपर्यंत असू शकतो. दरम्यान, एमकॉमनंतर सुरुवातीचा पगार दरवर्षी सुमारे ३ ते ५ लाख रुपये असतो. अनुभवानुसार पगार वाढतो.

### कोणते चांगले आहे, एमकॉम की एमबीए?

बीकॉमनंतर एमकॉम आणि एमबीए दोन्ही पसंत केले जातात. जेव्हा लवकर नोकरी शोधण्याचा विचार येतो तेव्हा एमबीए हा एक फायदा असल्याचे दिसून येते. याचे मुख्य कारण म्हणजे एमबीए हा नोकरी-केंद्रित आणि उद्योग-कनेक्टेड कोर्स आहे. दरम्यान, एमकॉम नंतर नोकरीच्या संधी अकाउंटिंग, कर आकारणी आणि वित्त यासारख्या क्षेत्रांपुरत्या मर्यादित आहेत. एमकॉमपेक्षा एमबीए हा विद्यार्थ्यांसाठी चांगला पर्याय असू शकतो. थोडक्यात म्हणजे, जर तुम्ही बीकॉम पूर्ण केल्यानंतर एमकॉम किंवा एमबीए करण्याचा विचार करत असाल तर ते पूर्णपणे तुमच्या आवडी आणि करिअरच्या ध्येयांवर अवलंबून असते. जर तुम्ही कॉर्पोरेट क्षेत्रात चांगल्या पगाराची नोकरी शोधत असाल आणि व्यवस्थापन किंवा नेतृत्व भूमिकांमध्ये काम करण्याचे स्वप्न पाहत असाल तर एमबीए हा योग्य पर्याय आहे. जर तुम्हाला अकाउंटिंग, फायनान्स, टॅक्सेशन किंवा रिसर्चमध्ये तज्ञ व्हायचे असेल, तर एमकॉम हा एक चांगला पर्याय असू शकतो.

# भारतात मेडिकल प्रॅक्टीससाठी जानेवारीत परीक्षा, इथे 14 नोव्हेंबरपासून FMG परीक्षा फॉर्म भरणे सुरू

**जर तुम्ही NEET परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर भारतात वैद्यकीय अभ्यास केला नसेल, परंतु तुम्हाला या देशात वैद्यकीय व्यवसाय करायचा असेल, तर FMG परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. त्याशिवाय, तुम्हाला वैद्यकीय व्यवसाय करण्याचा परवाना मिळणार नाही. राष्ट्रीय वैद्यकीय विज्ञान मंडळाने (NBEMS) FMGE डिसेंबर २०२५ च्या परीक्षेची अधिसूचना जारी केली आहे. FMGE साठी नोंदणी १४ नोव्हेंबर २०२५ पासून सुरू झाली आहे. NBE बोर्डाने १२ नोव्हेंबरच्या रात्री FMGE परीक्षेची सूचना जारी केली होती. सविस्तर सूचना/ माहिती बुलेटिन १४ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता nbe.edu.in या अधिकृत वेबसाइटवर अपलोड केले आहे. त्यानंतर अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. संपूर्ण वेळापत्रक, सूचना, नोंदणी लिंक आणि आवश्यक संपर्क तपशील यात दिले आहे.**

- अर्ज कसा करावा? : तुम्ही ऑनलाइन नोंदणी करून एफएमजीईसाठी अर्ज करावा. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ३ नंतर nbe fmge वेबसाइटवर अर्ज लिंक सक्रिय झाली आहे. सर्व आवश्यक माहिती भरून आणि शुल्क भरून तुम्ही अर्ज करू शकता. बोर्डाने असे म्हटले आहे की अर्ज सादरीकरण, अयशस्वी व्यवहारांसाठी परतफेड, पेमेंट गेटवे समस्या इत्यादींशी संबंधित प्रश्नांसाठी कृपया NBEMS उमेदवार केअर सपोर्टशी +९१-७९९६१६५३३३ वर संपर्क साधा.
- FMGE म्हणजे काय? : भारताबाहेर MBBS, MD, MS किंवा तत्सम वैद्यकीय पदवी पूर्ण केलेल्या आणि वैद्यकीय व्यवसायासाठी भारतात परत येऊ इच्छिणाऱ्या वैद्यकीय विद्यार्थ्यांनी FMGE परीक्षा दिली पाहिजे आणि उत्तीर्ण व्हावे. त्यानंतरच त्यांना वैद्यकीय व्यवसाय करण्याची कायदेशीर परवानगी आहे.

### महत्त्वाच्या तारखा कोणत्या आहेत?

परदेशी वैद्यकीय पदवीधर परीक्षा देशभरात एनबीईएमएसद्वारे सीबीटी मोडमध्ये, म्हणजेच ऑनलाइन मोडमध्ये घेतली जाईल.

कधी, काय...

एफएमजीई माहिती बुलेटिन डिसेंबर २०२५ प्रकाशन तारीखः १४ नोव्हेंबर २०२५, दुपारी ३ वाजेपासून.

एफएमजीई अर्ज फॉर्म भरण्याची तारीखः १४ नोव्हेंबर २०२५, दुपारी ३ ते ४ डिसेंबर २०२५, रात्री ११:५५ पर्यंत.

एफएमजीई परीक्षेची तारीखः १७ जानेवारी २०२६

एफएमजीई निकाल तारीखः १७ फेब्रुवारी २०२६



# बिझनेस

# SBI मध्ये खाते असेल तर लक्ष द्या...

जर तुमचे स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) मध्ये खाते असेल तर ही बातमी तुमच्यासाठी खूप महत्त्वाची आहे. SBI ने त्यांच्या ग्राहकांसाठी एक महत्त्वाची घोषणा केली आहे. ३० नोव्हेंबर २०२५ नंतर, बँक OnlineSBI आणि YONO Lite वरून mCASH पाठवण्याची आणि क्लेम करण्याची सुविधा बंद करणार आहे. याचा अर्थ ग्राहक आता mCASH चा वापर करून कोणाला त्यांचा खाते क्रमांक सेव्ह केल्याविनाच पैसे पाठवू शकणार नाहीत. सोबत mCASH लिंक किंवा ॲपद्वारे पाठवलेल्या पैशांवर क्लेमही करू शकणार नाहीत. एसबीआयने त्यांच्या वेबसाइटवर ही माहिती दिली आहे. बँकेने ग्राहकांना सल्ला दिला आहे, की पैसे पाठवण्यासाठी यूपीआय, आयएमपीएस, एनईएफटी आणि आरटीजीएस सारख्या सुरक्षित आणि व्यापकपणे




वापरल्या जाणाऱ्या डिजिटल पद्धतीचा वापर करावा. या पद्धतीदेखील खूप सोप्या आणि सुरक्षित आहेत. एसबीआय वेबसाइटवर दिलेल्या माहितीनुसार, ३० नोव्हेंबरनंतर mCASH (पाठवणे आणि क्लेम करणे) ची सुविधा ऑनलाइन एसबीआय आणि योनो लाइटवर उपलब्ध राहणार नाही. थर्ड पार्टीच्या लाभार्थ्यांना पैसे पाठवण्यासाठी यूपीआय, आयएमपीएस, एनईएफटी, आरटीजीएस इत्यादी पर्यायी व्यवहार पद्धती वापरा.

**mCASH चा वापर कसा केला जात होता? :** पूर्वी, ग्राहक गुगल प्ले स्टोअरवरून एसबीआय mCASH ॲप्लिकेशन डाउनलोड करू शकत होते. त्यानंतर ते लॉग इन करण्यासाठी MPIN नोंदणी करत होते. या MPIN चा वापर करून, ते SBI mCash ॲपमध्ये लॉग इन करू शकत होते.

# सोने आणि चांदी विसरून जा...

## हा धातू बनेल कुबेरचा खजिना; तज्ज्ञाने सांगितले, का बदलेल पुढील 10 वर्षांत परिस्थिती?

**या वर्षी सोने आणि चांदीच्या किमतीत लक्षणीय वाढ झाली आहे. चांगल्या परताव्यासाठी बरेच लोक त्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहेत. अनेक गुंतवणूकदारांचा असा विश्वास आहे की सोने आणि चांदी हे भविष्यातील धातू आहेत. परंतु एका तज्ज्ञाचे म्हणणे आहे की भविष्यातील धातू सोने किंवा चांदी नाही तर तांबे आहे. तज्ज्ञाचे म्हणणे आहे की तांबे हा भविष्य घडवू शकणारा धातू आहे.**

ज्येष्ठ विश्लेषक सुजय यू चेतावणी देतात, की भारतीय लोक सोन्याच्या मागे धावत आहेत, मात्र ते पुढील दशकात अचानक वाढ होण्याची शक्यता असलेल्या मालमत्तेकडे दुर्लक्ष करत आहेत. ते लिंक्डइनवर लिहितात, की तांबे हा असा धातू आहे जो पुढील ५ ते १० वर्षांत संपत्तीत रूपांतर होऊ शकतो. त्यांचा असा युक्तिवाद आहे की जवळजवळ सर्व भारतीयांना त्याच्या वाढत्या मागणीची माहिती नाही.



### सोने आणि तांब्यामध्ये काय फरक आहे?

तांबे सोन्यासारखे निष्क्रिय पडून राहत नाही. सुजय लिहितात, की एक धातू लॉकरमध्ये बसतो, तर दुसरा भविष्य चालवतो. सोने वाट पाहत असते, तर तांबे २४/७ काम करते. मॉर्गन स्टॅनलीच्या मते, एआय डेटा सेंटर्स आणि इलेक्ट्रिक वाहनांमुळे तांब्याची मागणी वेगाने वाढत आहे. ही मागणी पुरवठ्यापेक्षा खूपच जास्त आहे. तांबे खाण कामगार आधीच वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी संघर्ष करत आहेत. त्यामुळे भविष्यात तांब्याच्या किमती वाढण्याची अपेक्षा आहे.

- तांब्याची मागणी का वाढत आहे? : सुजय लिहितात की तांब्याशिवाय जग भविष्य घडवू शकत नाही. तांबे इलेक्ट्रिक वाहने, सौर पॅनेल, चार्जिंग स्टेशन, पॉवर ग्रिड आणि डेटा सेंटरसाठी आवश्यक आहे. हे सर्व ग्रीन, विद्युतीकृत अर्थव्यवस्थेचे प्रमुख आधारस्तंभ आहेत. परिणामी, तांब्याची मागणी सतत वाढत आहे. दुसरीकडे, त्याच्या पुरवठ्यात तीव्र कमतरता आहे. इंडोनेशियातील सर्वात मोठ्या तांब्या खाणींपैकी एक, ग्रासबर्ग पूर आणि दुर्घटनांमुळे प्रभावित झाली आहे. यामुळे २०२६ पर्यंत ६००,००० टनांपेक्षा जास्त उत्पादन तूट येण्याची भीती आहे. नवीन तांब्याची खाण उघडण्यास १० ते १५ वर्षे लागतात आणि विद्यमान खाणी कमी होत आहेत किंवा त्यांच्या धातूची गुणवत्ता कमी होत आहे.
- मॉर्गन स्टॅनलीनेही व्यक्त केली चिंता : मॉर्गन स्टॅनलीच्या अहवालानुसार, पुढील वर्षी म्हणजे २०२६ पर्यंत तांब्याच्या बाजारपेठेत २२ वर्षांतील सर्वात मोठी कमतरता भासेल. ही कमतरता ५.९० लाख टनांपर्यंत पोहोचू शकते. २०२९ पर्यंत ही कमतरता १.१ दशलक्ष टनांपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. २०२० नंतर पहिल्यांदाच जागतिक तांब्याचे उत्पादन कमी होणार असल्याने हे घडत आहे.
- कमी पुरवठा, वाढलेली किंमत : पुरवठ्याच्या कमतरतेमुळे तांब्याच्या बाजारपेठेत चिंता निर्माण झाली आहे. यामुळे अलीकडेच एकाच दिवसात तांब्याच्या किमतीत ३ ते ३.५% वाढ झाली आहे. गोल्डमन सॅक्स आणि सिटी यांनी आता पुढील काही वर्षांत तांब्याची किंमत प्रति टन ११,००० ते १४,००० डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज वर्तवला आहे. यामुळे २० ते ५०% किंमत वाढण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, सौर अनुदानात कपात करण्याच्या चीनच्या निर्णयामुळे आगीत इंधन भरले गेले. नवीन नियमांपूर्वी कंपन्यांनी सौर पॅनेल बसवण्याची घाई केली, ज्यामुळे वायरिंग आणि ग्रिड कनेक्शनसाठी तांब्याची मागणी वाढली.

# कमी प्रीमियम पाहून मोटार विमा घेत आहात? वेळीच लक्ष द्या, अन्यथा बसेल आर्थिक फटका...

**दिवाळीच्या अगदी आधी, जीएसटी दरांमध्ये लक्षणीय कपात करण्यात आली. या कपातीनंतर, काही कारच्या किमती एक ते दीड लाख रुपयांनी कमी झाल्या आहेत. याचा फायदा घेत कार्तिकने एका प्रसिद्ध कंपनीकडून कार खरेदी केली. पैसे वाचवण्यासाठी त्याने एका ऑनलाइन पोर्टलवरून ऑनलाइन कार विमा खरेदी केला, जिथे त्याला खूप कमी प्रीमियमवर विमा मिळाला. तथापि, अलीकडेच, त्याच्या कारचा गंभीर अपघात झाला. त्यानंतर, त्याला लक्षात आले की कमी प्रीमियमच्या नादात मोटार विमा खरेदी करण्यात त्याने मोठी चूक केली आहे...**

बजाज जनरल इन्शुरन्सचे मुख्य वितरण अधिकारी (रिटेल बिझनेस) राकेश कौल म्हणतात, की मोटार विमा हा केवळ नियामक औपचारिकता पूर्ण करण्याबद्दल नाही. जोखीम आणि जबाबदारीबद्दल तुम्ही किती सक्रिय आहात हेही त्यातून दिसून येते. कधी कधी लोक मोटार विम्यावर थोडे पैसे वाचवण्याच्या प्रयत्नात मोठी चूक करतात. त्यांना फक्त थर्ड-पार्टी लायबिलिटी कव्हर खरेदी करण्याचे कायदेशीर बंधन पूर्ण करण्याची चिंता असते. आम्ही तुम्हाला सांगतो, की मोटार विमा खरेदी करताना काय विचारात घ्यावे.

**विमा पॉलिसी खरेदी करताना त्याचे महत्त्व न समजणे...**

मोटर विमा आवश्यक आहे. परंतु बरेच लोक ते फक्त कायदेशीर बंधन मानतात. मोटार विम्याचे खरे महत्त्व त्यांना फक्त तेव्हाच समजते जेव्हा त्यांना दावा करण्याची गरज पडते. पॉलिसीच्या अटी, कागदपत्रे किंवा कव्हरेजची समज नसल्यामुळे या समस्या उद्भवतात. तुमची पॉलिसी कशी कार्य करते हे समजून घेणे आणि पॉलिसी खरेदी करताना माहितीपूर्ण निर्णय घेणे यामुळे दावा नाकारणे टाळण्यास मदत होऊ शकते.

**योग्य इंश्योर्ड डिक्लेयर्ड व्हॅल्यू (आयडीव्ही) निवडा**

इंश्योर्ड डिक्लेयर्ड व्हॅल्यू (IDV) ही तुमच्या मोटार विमा पॉलिसी अंतर्गत कमाल विमाकृत रक्कम आहे, जी दावा झाल्यास तुमचा विमाकर्ता किती कमाल रक्कम देईल हे दर्शवते. हे सहसा तुमच्या वाहनाच्या वयावर आधारित चार्ट वापरून निश्चित केले जाते, परंतु जर तुमचे वाहन पाच वर्षांपेक्षा जास्त जुने असेल तर ते तुम्ही आणि विमा कंपनी संयुक्तपणे ठरवतात. आयडीव्ही तुमच्या वाहनाच्या सध्याच्या बाजार मूल्यावर देखील अवलंबून असते, ज्यामध्ये त्याची मेक, मॉडेल, वय आणि घसारा यांचा समावेश आहे. योग्य आयडीव्ही निश्चित करणे महत्त्वाचे आहे, कारण ते तुमच्या प्रीमियम आणि कमाल दाव्याच्या रकमेवर परिणाम करते. कमी आयडीव्ही तुमचा प्रीमियम कमी करू शकतो, परंतु त्यामुळे तुम्हाला अपुऱ्या कव्हरेजचा धोका निर्माण होऊ शकतो, तर उच्च आयडीव्ही तुमचे खर्च अनावश्यकपणे वाढवू शकते. तुमच्या वाहनाच्या सध्याच्या बाजार मूल्याशी सुसंगत, संतुलित मूल्य मिळविण्यात आणि पुरेसे कव्हरेज सुनिश्चित करण्यात मदत करण्यासाठी तुमच्या विमा कंपनी किंवा सल्लागाराचा सल्ला घेणे चांगली कल्पना आहे.

**अचूक, पूर्ण माहिती द्या**

विमा पॉलिसी कायदेशीर करार आहेत, म्हणून तुमची पॉलिसी खरेदी करताना अचूक आणि संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. तुमच्या वाहनाचा नोंदणी क्रमांक, चेसिस नंबर, मालकाचे नाव, पत्ता, पिन कोड आणि मागील दाव्याचा इतिहास यासारखी माहिती योग्यरित्या प्रविष्ट करा. अचूक तपशील प्रदान केल्याने तुम्हाला दावा दाखल करताना अनावश्यक कागदपत्रे आणि विलंब टाळण्यास मदत होते. आणि तुमचे सर्व कागदपत्रे तयार असल्याने प्रक्रिया सोपी आणि सुरळीत होते.

# परिशिष्ट १०

## (प्रभागनिहाय प्रारुप आरक्षण प्रसिध्दी, नमूना-मराठी)

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड, सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता क्रमांक रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३०/का-५ दिनांक १४.१०.२०२५ अन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अंतिम प्रभाग रचनेमधील प्रत्येक प्रभागातील जागानिहाय आरक्षण खालीलप्रमाणे राहील.**

एकूण जागांचा तपशील.

| अ.क्र. | प्रवर्ग | एकूण जागांची संख्या | पैकी त्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित जागांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | १५ | ०८ |
| २ | अनुसूचित जमाती | ०२ | ०१ |
| ३ | नागरिकावा मागासवर्ग प्रवर्ग | २१ | ११ |
| ४ | सर्वसाधारण | ४३ | २१ |
| | एकूण | ८१ | ४१ |

प्रभागातील जागानिहाय आरक्षणाचा तपशील

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | जागा क्र. | आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | १ | १-अ | अनुसूचित जाती महिला |
| २ | | १-ब | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| ३ | | १-क | सर्वसाधारण महिला |
| ४ | | १-ड | सर्वसाधारण |
| ५ | २ | २ अ | अनुसूचित जाती महिला |
| ६ | | २-ब | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| ७ | | २-क | सर्वसाधारण महिला |
| ८ | | २-ड | सर्वसाधारण |
| ९ | ३ | ३-अ | अनुसूचित जाती महिला |
| १० | | ३-ब | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| ११ | | ३-क | सर्वसाधारण महिला |
| १२ | | ३-ड | सर्वसाधारण |
| १३ | ४ | ४-अ | अनुसूचित जाती |
| १४ | | ४-ब | अनुसूचित जमाती महिला |
| १५ | | ४-क | नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग महिला |
| १६ | | ४-ड | सर्वसाधारण |
| १७ | ५ | ५-अ | अनुसूचित जाती |
| १८ | | ५-ब | नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग महिला |
| १९ | | ५-क | सर्वसाधारण महिला |
| २० | | ५-ड | सर्वसाधारण |
| २१ | ६ | ६-अ | अनुसूचित जाती महिला |
| २२ | | ६-ब | नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग |
| २३ | | ६-क | सर्वसाधारण महिला |
| २४ | | ६-ड | सर्वसाधारण |
| २५ | ७ | ७-अ | अनुसूचित जाती |
| २६ | | ७-ब | नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग महिला |
| २७ | | ७-क | सर्वसाधारण महिला |
| २८ | | ७-ड | सर्वसाधारण |
| २९ | ८ | ८-अ | अनुसूचित जाती |
| ३० | | ८-ब | नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग महिला |
| ३१ | | ८-क | सर्वसाधारण महिला |
| ३२ | | ८-ड | सर्वसाधारण |
| ३३ | ९ | ९-अ | अनुसूचित जाती महिला |
| ३४ | | ९-ब | नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग |
| ३५ | | ९-क | सर्वसाधारण महिला |
| ३६ | | ९-ड | सर्वसाधारण |
| ३७ | १० | १०-अ | अनुसूचित जाती |
| ३८ | | १०-ब | नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग महिला |
| ३९ | | १०-क | सर्वसाधारण महिला |
| ४० | | १०-ड | सर्वसाधारण |

| अ.क्र. | प्रवर्ग | एकूण जागांची संख्या | पैकी त्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित जागांची संख्या |
|---|---|---|---|
| ४१ | ११ | ११-अ | नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग महिला |
| ४२ | | ११-ब | सर्वसाधारण महिला |
| ४३ | | ११-क | सर्वसाधारण |
| ४४ | | ११-ड | सर्वसाधारण |
| ४५ | १२ | १२-अ | नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग |
| ४६ | | १२-ब | सर्वसाधारण महिला |
| ४७ | | १२-क | सर्वसाधारण महिला |
| ४८ | | १२-ड | सर्वसाधारण |
| ४९ | १३ | १३-अ | अनुसूचित जाती महिला |
| ५० | | १३-ब | नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग महिला |
| ५१ | | १३-क | सर्वसाधारण |
| ५२ | | १३-ड | सर्वसाधारण |
| ५३ | १४ | १४-अ | अनुसूचित जाती |
| ५४ | | १४-ब | नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग महिला |
| ५५ | | १४-क | सर्वसाधारण महिला |
| ५६ | | १४-ड | सर्वसाधारण |
| ५७ | १५ | १५-अ | नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग |
| ५८ | | १५-ब | सर्वसाधारण महिला |
| ५९ | | १५-क | सर्वसाधारण महिला |
| ६० | | १५-ड | सर्वसाधारण |
| ६१ | १६ | १६-अ | नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग |
| ६२ | | १६-ब | सर्वसाधारण महिला |
| ६३ | | १६-क | सर्वसाधारण महिला |
| ६४ | | १६-ड | सर्वसाधारण |
| ६५ | १७ | १७-अ | नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग महिला |
| ६६ | | १७-ब | सर्वसाधारण महिला |
| ६७ | | १७-क | सर्वसाधारण |
| ६८ | | १७-ड | सर्वसाधारण |
| ६९ | १८ | १८-अ | अनुसूचित जाती महिला |
| ७० | | १८-ब | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| ७१ | | १८-क | सर्वसाधारण महिला |
| ७२ | | १८-ड | सर्वसाधारण |
| ७३ | १९ | १९-अ | अनुसूचित जाती |
| ७४ | | १९-ब | अनुसूचित जमाती |
| ७५ | | १९-क | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| ७६ | | १९-ड | सर्वसाधारण महिला |
| ७७ | २० | २०-अ | अनुसूचित जाती महिला |
| ७८ | | २०-ब | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| ७९ | | २०-क | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| ८० | | २०-ड | सर्वसाधारण महिला |
| ८१ | | २०-ई | सर्वसाधारण |

**दिनांक ८/११/२०२५ रोजीच्या जाहीर सूचनेस नमूद केल्यानुसार आरक्षणाबाबत काही हरकती व सूचना असल्यास त्या दिनांक १७/११/२०२५ ते २४/११/२०२५ दुपारी ३ वाजेपर्यंत या कालावधीत निवडणूक विभाग स्टेडियम परिसर मनपा नांदेड येथे सादर कराव्यात.**

**स्वाक्षरीत**
**(डॉ. महेशकुमार डोईफोडे)**
आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,
नांदेड

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५४१९००, ७७६७७११७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



### योगाचार्य सीताराम सोनटक्के यांना नांदेड योग भूषण पुरस्कार प्रदान

## योग केल्यामुळे मनाचे प्रदूषण आजारापासून लांब राहते - नरेंद्र चव्हाण



**नांदेड (प्रतिनिधी)** – योग केल्यामुळे मनाचे प्रदूषण आजारापासून लांब राहते. तसेच ज्यांच्याकडे लक्ष्मी आहे ती येते किंवा जाते परंतु ज्यांच्याकडे सरस्वती आहे त्यांच्याकडे लक्ष्मीही असते, असे प्रतिपादन भाऊराव सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष नरेंद्र चव्हाण यांनी केले.

भारतीय जनता पक्ष आणि नित्य योग सेवा बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड येथील प्रभाग क्रमांक चार नाईक नगर येथील स्व. वसंतराव नाईक उद्यानात आठ दिवसीय रोगमुक्तीसाठी मोफत योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ह्या शिबिराच्या समारोपीय प्रसंगी नरेंद्र चव्हाण बोलत होते.

योगाचार्य नांदेड भूषण तथा योगऋषी स्वामी रामदेव बाबा यांनी आदर्श योग शिक्षक पुरस्कार म्हणून गौरवलेले सीताराम सोनटक्के गुरुजी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली हे शिबीर संपन्न झाले. या शिबिराला चांगला प्रतिसाद लाभला.

या शिबिरासाठी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली नांदेडच्या माजी महापौर सौ. शैलजाताई स्वामी, स्थायी समितीचे माजी सभापती किशोर स्वामी तसेच नगरसेवक दयानंद वाघमारे यांनी संयोजनाची मोठी जबाबदारी पेलली. योग शिबिराच्या समारोपीय प्रसंगी भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष नरेंद्र चव्हाण यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी योग गुरु सीताराम सोनटक्के, गजानन कदम, नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका गायत्री कदम, माजी नगरसेविका सुनंदा पाटील, दीपक पाटील, माजी नगरसेवक विश्वास कदम, अनुसया चौधरी, मीनाक्षी चिल्लरगे, संतोष मुगटकर आदींची उपस्थिती होती.

**नांदेड योग भूषण**

याप्रसंगी योगाचार्य नांदेड भूषण सीताराम सोनटक्के गुरुजी यांना भारतीय जनता पक्ष, शिबीर संयोजकांच्या वतीने नांदेड योग भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात प्रा. विलास गारोळे यांच्या संगीत संचाने आठ दिवस आपली उत्कृष्ट संगीत सेवा दिली. समारोपीय कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पोवाड्याने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तर योग साधक पत्रकार मकरंद पांगरकर, सौ. रेखा धूत, योगाने ब्रेन ट्युमर बरा झालेला शशिकांत गंगाधर कदम यांनी प्रतिक्रिया दिल्या. तर कु. सिद्धी कोकरे हिने बहारदार भरत नाट्यम नृत्य केले.

## क्रीडा महोत्सवासाठी वसतिगृह खाली करण्याच्या आदेशााचा विद्यार्थी काँग्रेसकडून निषेध

### आदेश मागे घेण्याची जिल्हाध्यक्ष सुरज शिंदे यांची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)** – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथे क्रीडा महोत्सव २०२५-२६ चे आयोजन करण्यात येत असून, सहभागी होणाऱ्या जवळपास साडेचार हजार स्पर्धकांच्या निवास व्यवस्थेसाठी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना आठवडाभर वसतिगृह खाली करण्याचे आदेश विद्यापीठ प्रशासनाने दिले आहेत. दरम्यान या आदेशा विरोधात विद्यार्थी काँग्रेस एनएसयूआयने आक्रमक पावित्रा घेतला आहे. सदर आदेश वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी अन्यायकारक असून, त्वरित आदेश मागे घ्यावेत अन्यथा लाक्षणिक उपोषण करू, असा इशारा एनएसयूआयचे जिल्हाध्यक्ष सुरज शिंदे यांनी निवेदनातून दिला आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथे क्रीडा महोत्सव २०२५-२६ चे आयोजन करण्यात येत आहे. यात जवळपास साडेचार हजार स्पर्धक सहभागी होणार आहेत. यामुळे त्यांच्या निवासाच्या सोईसाठी विद्यापीठातील वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी



आठ दिवसांसाठी वसतिगृह खाली करावे असा आदेश विद्यापीठ प्रशासनाने दिला आहे. हा आदेश अन्यायकारक असून प्रवेश घेते वेळी विद्यार्थ्यांना संभाव्य परिस्थितीबद्दल अवगत केले गेले नाही अशी भूमिका विद्यार्थी काँग्रेस एनएसयूआयने घेतली आहे. या कालावधीत विद्यार्थ्यांची हेळसांड होऊन शैक्षणिक नुकसान होणार आहे त्यामुळे हा आदेश मागे घ्यावा अन्यथा विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी तीव्र आंदोलन करू, असा इशारा एनएसयूआयचे जिल्हाध्यक्ष सुरज शिंदे यांनी निवेदनातून विद्यापीठ प्रशासनाला दिला आहे. यावेळी विद्यार्थी व एनएसयूआयचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोलीस दलाच्या तक्रार निवारणदिनी १३० अर्ज निकाली

### पोलिसांच्या उपक्रमांचे सर्वांकडून स्वागत



**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्हा पोलीस दलातर्फे मिशन समाधान अंतर्गत तक्रार निवारण दिनाचे अनुषंगाने स्थानिक व वरिष्ठ असे एकूण १३० अर्ज निकाली काढण्यात आले. या तक्रार दिनानिमित्त अनेक पीडितांना न्याय मिळत असल्याने पोलीस दलाच्या या उपक्रमांचे स्वागत होत आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना दर शनिवारी नागरिकांच्या तक्रार निवारणाच्या अनुषंगाने मोहीम राबविणे बाबत आदेश दिले होते. जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनमध्ये प्रलंबित अर्जाची संख्या वाढली होती. सदर अर्ज वेळेत निकाली काढणे आवश्यक असल्याने तक्रारी अर्ज तत्काळ निकाली काढण्यासाठी सुचना दिल्या होत्या. तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी यांना त्यांच्या उपविभागातील एका पोलीस ठाण्यात हजर राहून तक्रारींचे निराकरण करण्याबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे १५ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यामध्ये तक्रार निवारण दिनाच्या अनुषंगाने स्थानिक व वरिष्ठ असे एकूण १३० अर्ज निकाली काढण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील भोकर, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने, प्रशांत शिंदे यांच्यासह सर्व ठाण्याचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

## टाकळी (बु.) येथे दत्तात्रय देवाची सव्वा खंडी तांदुळाची महापूजा

**नायगाव (प्रतिनिधी)** – तालुक्यातील टाकळी (बु.) येथे रविवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी दत्तात्रय देवाची सव्वा खंडी तांदुळाची महापूजा करण्यात आली. यावेळी तुपपोळीच्या सार्वजनिक महाप्रसादाचा सोहळा महंत अवधूतगीर महाराज मठ संस्थान बाचोटी डोंगर यांच्या उपस्थितीत पार पडला.

या धार्मिक सोहळ्यास माजी जिल्हा परिषद सदस्या पुनमताई पवार, प्रो. डॉ. मनोहर तोटरे, आनंदराव पाटील बावणे, यादवराव पाटील भेलोंडे, सचिन पाटील टाकळीकर, सुहास पाटील टाकळीकर, अवकाश पाटील धुपेकर, माणिकराव पाटील घाटोळे, हनमंत वाघमारे, माधव पाटील घाटोळे, सय्यद समदानी, अभिजित वाघमारे, लक्ष्मण कांबळे



यांच्यासह परिसरातील भाविक उपस्थित होते. पहाटेपासूनच मंदिर परिसर दत्तमय झाला होता. दत्ता दिगंबरा, देवा दत्ता दिगंबरा, जय गुरूदत्तच्या जयघोषाने संपूर्ण वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले. पूजाअर्चा, मंत्रोच्चार आणि आरत्या यामुळे संपूर्ण परिसर अधिकच मंगलमय झाला.

यावेळी गाव आणि परिसरातील भाविकांनी मोठ्या श्रद्धेने दर्शन घेतले. महापूजेनंतर तुपपोळीच्या महाप्रसादासाठी भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. सर्वत्र उत्साहाचे, श्रद्धेचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. टाकळी (बु.) परिसर दत्तमय भक्तिरसात रंगून गेला होता.

### कुंडलवाडी नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक

## नगरसेवक पदासाठी ८३ अर्ज व नगराध्यक्षपदासाठी ५ नामनिर्देशनपत्र दाखल

**कुंडलवाडी (प्रतिनिधी)** – कुंडलवाडी नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ अनुषंगाने नामनिर्देशन प्रक्रियेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. अध्यक्ष व सदस्य पदांसाठी मोठ्या संख्येने उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत.

रविवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी दाखल झालेल्या नामनिर्देशनपत्रांची आकडेवारी पुढीलप्रमाणे- अध्यक्ष पदासाठी : ०३ अर्ज, सदस्य पदासाठी ५२ अर्ज तर दि. १० नोव्हेंबर २०२५ ते दि. १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत अध्यक्ष पदासाठी एकूण ५ अर्ज, सदस्य पदासाठी ८३ अर्ज दाखल झाले असल्याची माहिती निवडणूक विभागाने दिली.

कुंडलवाडी नगर परिषदेच्या निवडणुका येणाऱ्या २ डिसेंबर २०२५ रोजी पार पडणार असून, निवडणूक प्रक्रिया सुरळीत व पारदर्शक पार पाडण्यासाठी प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली आहे. उमेदवारांनी आणि समर्थकांनी शिस्त व नियमांचे पालन करावे, असे आवाहनही निवडणूक अधिकाऱ्यांनी केले आहे.

## नांदा सौख्य भरे

### निलावार -पवार

नांदेड येथील रहिवासी श्रीमती पद्मा व कै. प्रकाश निलावार यांचे नातू व सौ. सीमा व प्रशांत प्रकाश निलावार यांचे चिरंजीव हिमांशू यांचा विवाह कै. जयश्री व कै. रामराव भाऊराव पवार यांची नात व सौ. मेघना व श्री प्रवीण रामराव पवार (आयपीएस) यांची सुकन्या चि. सौ. कां. प्राजक्ता हिजसमवेत नुकताच पार पडला असून, त्या अनुषंगाने सोमवार, दि. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता तीर्थ फिल्ड ग्राऊंड, श्री राम नगर, पुणे येथे स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला आहे. वधू-वरांस हार्दिक शुभेच्छा.

**मुख्य संपादक**

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसची कार्यकारिणी जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)** – राष्ट्रवादी युवक काँग्रेसची जिल्हा कार्यकारिणी नांदेड जिल्ह्याचे माजी खासदार तथा लोहा-कंधार मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या मान्यतेने भोकर येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब रावणगावकर, ज्येष्ठ नेते नागनाथ घिसेवाड, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष इंजि. स्वप्नील इंगळे पाटील यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केली.

या कार्यकारिणीत सर्व जाती, धर्मातील व सर्व घटकातील युवकांना संधी देण्यात आली आहे. या कार्यकारिणीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राष्ट्रवादी. काँग्रेस पक्षाला फायदा होणार आहे. या कार्यकारिणीमध्ये हदगाव, हिमायतनगर विधानसभा अध्यक्ष म्हणून अभिलाष जैस्वाल, किनवट, माहूर विधानसभा अध्यक्ष अमोल जाधव, अर्धापूर तालुका अध्यक्षपदी विलास कल्याणकर, अर्धापूर शहर अध्यक्षपदी अनिकेत आवादे, भोकर तालुका अध्यक्षपदी परसराम पाटील जाधव, भोकर शहर अध्यक्षपदी विशाल देशमुख, हिमायतनगर तालुका अध्यक्षपदी शितलकुमार सेवणकर, हिमायतनगर शहर अध्यक्षपदी शेख माजीद शेख याकुब, हदगाव तालुका अध्यक्षपदी अंकुश शिंदे, हदगाव शहर अध्यक्षपदी मुजाहिद मिर्झा, किनवट तालुका अध्यक्षपदी चेतन मुंडे, माहुर तालुका अध्यक्षपदी संतोष कोपुलवार, यांची निवड करण्यात आली. तर जिल्हा कार्यकारिणीत अनेक होतकरू व सर्वसमावेशक अशा युवकांना संधी देण्यात आली.

या कार्यकारिणीत वरिष्ठ जिल्हा उपाध्यक्ष म्हणून मनोज मुखेडकर, जिल्हा उपाध्यक्षपदी सय्यद जफर, संदीप राऊत, शिवम जयस्वाल सरचिटणीस पदी महावीर आडे, गौतम भवरे, विजय कदम, पांडुरंग पावडे, कृष्णा पाटील, कैलास पाटील इंगळे, जिल्हा चिटणीसपदी रमेश पाटील जिल्हा सचिवपदी शिवराज कल्याणकर, दत्ता पारवे, राजेंद्र पावडे जिल्हा संघटकपदी चैतन्य वाघमारे व कामेश मुनेश्वर यांची निवड करण्यात आली आहे.

## कोबींग ऑपरेशन दरम्यान एक हद्दपार, सात आरोपींना अटक

**नवीन नांदेड** -नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यांतर्गत एकाच वेळी हद्दीत कोबिंग ऑपरेशन, रेकॉर्डवरील गुन्हेगारांची झाडाझडती घेतली. यावेळी विविध भागात पाच अधिकारी व २७ पोलीस कर्मचारी यांनी वेगवेगळ्या भागात २२ रेकार्डवरील गुन्हेगारांची तपासणी केली. तसेच बेलेबल वॉरंटमधील पाच व दोन नॉन बेलेबेल वॉरंटमधील आरोपींना अटक केली आहे.

ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी वरीलप्रमाणे पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्यासह १६ नोव्हेंबर रात्री ३ वाजतापासून ते सकाळी ८ वाजेपर्यंत पो. स्टे. नांदेड ग्रामीण हद्दीत कॉम्बींग ऑपरेशन राबविले. यामध्ये जास्तीत जास्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी एकाच वेळी



वेगवेगळ्या ठिकाणावरून बळीरामपूर, वसरणी, धनेगाव, सिडको, हडको, गोविंदकॉलनी, कौठा, वाजेगाव, विष्णुपुरी अशा विविध भागांमध्ये अचानक छापेमारी केली. यामध्ये विशेष करून महाराष्ट्र पोलीस अधिनियमप्रमाणे ज्या आरोपींना हद्दपार करण्यात आले आहे असे हद्दपार आरोपी घरी येत आहेत का किंवा घरी वावरत आहेत का त्यांचा घरी जावुन व हद्दीत शोध घेतला. तसेच रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार, शस्त्र अधिनियममधील रेकॉर्डवरील गुन्हेगार, घरफोडीमधील आरोपी यांचे घरी जावुन आरोपींना चेक केले. आरोपीतांच्या घरांच्या झडत्या घेतल्या, प्रस्तावीत एम. पी. डी. ए. तसेच एम.पी.डी.ए. मधून जामिनावर आलेले आरोपी चेक केले. कॉम्बीग ऑपरेशन दरम्यान २२ रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक केले. चोरी, घरफोडीतील ०७ आरोपी, हद्दपार करण्यात आलेले १० आरोपी यांच्या घराची झडती घेवुन त्यांना चेक करण्यात आले.

## बरडशेवाळा आरोग्य केंद्रात औषधींचा तुटवडा

### औषध पुरवठ्यासाठी नाते माणुसकीचे ग्रुपची सामाजिक बांधीलकी



**नांदेड (प्रतिनिधी)** – केंद्र व राज्य शासन विविध योजनेच्या माध्यमातून आरोग्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करीत आहे. पण यामध्ये गेल्या काही दिवसांपासून साथीच्या आजारात वाढ झाली आहे.

पण यामध्ये गेल्या काही महिन्यांपासून साथीच्या आजाराची वाढ झालेली असताना जिल्हा स्तरावरून मिळणारा औषध पुरवठा कमी मिळत आहे. त्यामुळे आरोग्य केंद्रातील अधिकारी, कर्मचारीवर्गाला काम करत असताना रुग्ण व नातेवाईकांच्या रोषाला तोंड देताना अनेक अडचणी येत आहेत.

गेल्या सहा वर्षांपासून अनेक समाजोपयोगी कार्य करणाऱ्या बरडशेवाळा ता. हदगांव सोशल मीडिया ग्रुपवर केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनचे हदगांव तालुकाध्यक्ष विश्वासराव देशमुख ईरापूरकर यांनी हदगांव तालुका व नांदेड जिल्हा सयुंक्त विद्यमाने ३० हजार रुपये किंमतीचे मेडिकल साहित्य दिल्याने तात्पुरता दिलासा मिळाला.

गरजेनुसार नाते माणुसकीचे बरडशेवाळा ता. हदगांव ग्रुपवर गरजेनुसार औषध पुरवठ्यासाठी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत पळसा शिवसेना सर्कल प्रमुख गजानन अनंतवार कवानकर यांनी शंभर स्लाईनसह आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिले तर माजी सरपंच पिंटु पाटील पिंपरखेडकर, फारुख पिंजारी हदगांवकर, सामाजिक कार्यकर्त्यां सविताताई निमडगे पळसेकर, प्रभाकर दहिभाते, आरोग्य मित्र दिनेश दहिभाते यांनी औषध पुरवठ्यासाठी योगदान देत सामाजिक बांधिलकी जोपासली. गरजेनुसार राष्ट्रीय महामार्गावर रोडलगत अती संवेदनशील असलेल्या बरडशेवाळा प्राथमिक आरोग्य केंद्राला रिक्त पदासह औषध पुरवठा तात्काळ उपलब्ध करून द्यावा अशी मागणी होत आहे.

## धनेगाव जिल्हा परिषदेसह पंचायत समिती गणावर भगवा फडकावा -शिवसेनेचे उपनेते आ. हेमंत पाटील

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – धनेगाव जि. प. गटातील सर्व गावे शिवसेनेशी एकनिष्ठ आहेत. या सर्कलमधूल निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या इच्छुकांनी एकत्र येऊन प्रचार करावा. मतदारांशी संपर्क साधावा व माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून केलेल्या सामाजिक कार्यासह, वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य जनतेपर्यंत पोहोचवावे. जिल्हा परिषद सर्कल व पंचायत समिती गणातील इच्छुक उमेदवारांनी प्रचाराला लागावे, असे आवाहन शिवसेनेचे उपनेते आ. हेमंत पाटील यांनी केले. ते आढावा बैठकीत बोलत होते.

नांदेड जिल्हा परिषदेच्या नवनिर्वाचित धनेगाव जिल्हा परिषद सर्कल निवडणूक निमित्ताने बुथ प्रमुख, शाखा प्रमुख यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक उपनेते हेमंत पाटील व प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत रविवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी श्रीकांत ट्रेडिंग कंपनी आडत दुकान, जवाहर नगर तुप्पा येथे पार पडली.

नांदेड तालुक्यातील नव्याने धनेगाव सर्कल निर्माण झाल्यानंतर आगामी जिल्हा परिषद निवडणूक अनुषंगाने आरक्षण सोडत नंतर हा मतदारसंघ सर्वसाधारण महिलासाठी राखीव झाला आहे. या मतदार संघात जवळपास दहा गावे अनुक्रमे धनेगाव व तुप्पा, दोन पंचायत समिती गण आले आहेत. प्रथमच झालेल्या या मतदारसंघावर वर्चस्व सिद्ध करण्यासाठी व भगवा झेंडा फडकिवण्यासाठी शिवसेना शिंदे गटाचे उपनेते ना. हेमंत पाटील, नांदेड तालुका प्रमुख उध्दव पाटील शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी पाटील कदम, माजी पंचायत समिती सदस्य दाजीबा राठोड, सर्कल प्रमुख बालाजी पाटील भायेगावकर, काकांडी उपसरपंच सुदिन बागल, दत्ता पाटील कदम, सेवानिवृत्त सैनिक मनोहर कदम, सिडको उपशहर प्रमुख पप्पू गायकवाड, नामदेव पुयड यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपनेते आमदार हेमंत पाटील



यांनी धनेगाव सर्कलमधील दहा गावांत प्रचाराला लागा, आमच्या परिवारातील कोणीही सदस्य निवडणुकीसाठी उभा टाकणार नसल्याचे सांगून कार्यकर्त्यांना संधी देण्यात येणार असल्याचे सांगितले.

पांदण रस्त्यासाठी मी राज्य समिती सदस्य या नात्याने कटीबद्ध असल्याचे सांगितले. यावेळी दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर हे विकासासाठी कटिबद्ध आहेत. त्यांच्या मतदारसंघातील जि. प. व पंचायत समिती सर्वाधिक जागा निवडून आल्या पाहिजेत असेही ते म्हणाले.

यावेळी जिल्हा परिषदेत चार इच्छुक उमेदवारांसह पंचायत समिती उमेदवारांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी उपस्थित मान्यवराची मार्गदर्शनपर भाषणे झाली तर प्रास्ताविक सर्कल प्रमुख बालाजी पाटील भायेगावकर यांनी केले. सूत्रसंचालन मुरली पाटील पुयड यांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांचे फटाक्यांच्या आतीषबाजीत स्वागत करण्यात आले.

यावेळी गंगाधर पाटील खोसडे, शिवाजी कदम, बबन पाटील कदम, रावसाहेब बंडे, काळबा पाटील काकांडी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीचे आयोजन भायेगावचे सरपंच सौ. सविता बालाजी पाटील भायेगावकर यांनी केले होते.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com